POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२५६ ● मुंबई, शुक्रवार, १८ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ‘बाळासाहेब असते तर यांना चाबकानं फटकारलं असतं’

## नाव न घेता शिंदेंचा पुन्हा ठाकरेंवर हल्लाबोल

**■मुंबई। प्रतिनिधी :**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गट आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते त्यांच्या मुळगावी दरेगाव येथे बोलत होते. इतिहास गद्दारांना कधीच माफ करणार नाही, हे बरोबर आहे. ज्यांनी बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी केली. ज्यांनी बाळासाहेबांशी बेमानी केली, गद्दारी केली त्यांना इतिहास कधीच माफ करणार नाही. साहेबांनी सांगितलं होतं काँग्रेससोबत जायचं नाही हे काँग्रेससोबत गेले, असं हल्लाबोल यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचं नाव न घेता केला आहे.

गावाकडे आलो की वृक्ष लागवडीचा माझा कार्यक्रम असतो. गावकऱ्यांना माझं आव्हान आहे शेती भाती वरती अवलंबून न राहता फळझाडे लावली पाहिजेत. एकत्रित येऊन समूह शेती केली तर लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. नागरिकांनी निसर्गाला सांभाळलं पाहिजे निसर्गाचे रक्षण केलं पाहिजे. ती संकल्पनाच आहे, नवीन महाबळेश्वर या ठिकाणी पर्यटन मोठ्या प्रमाणात वाढेल, असंही यावेळी शिंदे यांनी म्हटलं आहे.



**नेमकं काय म्हणाले एकनाथ शिंदे?**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोले केला आहे. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये लोकांनी शिक्कामोर्तब केलं, नकली लोकांना नाकारलं आणि बाळासाहेबांचे विचार पुढे नेणाऱ्यांना स्विकारलं. इतिहास गद्दारांना कधीच माफ करणार नाही हे बरोबर आहे, ज्यांनी बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी केली, ज्यांनी बाळासाहेबांशी बेमानी केली गद्दारी केली त्यांना इतिहास कधीच माफ करणार नाही. साहेबांनी सांगितलं होतं काँग्रेस सोबत जायचं नाही हे काँग्रेस सोबत गेले, असा हल्लाबोल एकनाथ शिंदे यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, साहेबांचे नकली खोटे आवाज काढून कोणी लोक यांच्याकडे येणार नाहीत. जर असली असाल तर तुम्हाला नकली आवाज काढण्याची गरज काय? हा पोरकटपणा आहे, हा थिल्लार पणा आहे. बाळासाहेबांना वेदना देण्याचं, बाळासाहेबांचा अपमान करण्याचं हे काम आहे. साहेब असते तर त्यांनी त्यांना चाबकाने फटकारलं असतं, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

## मुंबईत गुजरात्यांकडून मराठी कुटुंबाला अपमानास्पद वागणूक

## तुम मराठी लोग गंदा है, तुम मच्छी मटण खाते हो...

**■मुंबई। प्रतिनिधी :**

स्वप्नांचं शहर असलेल्या मुंबईत विविध जातीचे, धमार्चे लोकं येतात आणि स्वप्न पूर्ण करण्याच्या उद्देशाने इथे मेहनत करून राहतात. कोणी काय खावं-प्यावं हा खरंतर ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे, पण गेल्या काही महिन्यांपासून मुंबईत खाण्या-पिण्याच्या मुद्यावरून वाद होताना दिसत असून महाराष्ट्राचा, मुंबईचा सख्खा पुत्र असलेल्या मराठी माणसांनाच अपमानास्पद वागणूक मिळत आहे. काही महिन्यांपूर्वी कल्याणमध्ये परप्रांतीय कुटुंबांनी बाहेरुन गुंड आणून मराठी कुटुंबाला मारहाण केल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता. मराठी माणसांना मुंबईत चुकीची वागणूक दिल्याच्या अनेक घटना समोर आल्या असून घाटकोपरमध्ये याच प्रकाराची पुनरावृत्ती झाली आहे.

घाटकोपरमध्ये मराठी कुटुंबाला अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. मांसाहार करतात म्हणून गुजराती कुटुंबाकडून मराठी कुटुंबातील लोकांचा अपमान केला असा मनसेचा आरोप आहे. मनसे पदाधिकाऱ्याने यासंदर्भातील पोस्ट केली असून त्यामुळे मुंबईत पुन्हा मराठी विरुद्ध अमराठी हा वाद शिगेला पोहोचल्याचे दिसत आहे. यामुळे नवा गदारोळ माजण्याची शक्यता आहे.



**नेमकं काय घडलं ?**

मिळालेल्या माहितीनुसार, घाटकोपरमधील एका सोसायटीत हा प्रकार घडला. तेथे मराठी वि. अमराठी हा वाद चांगलाच पेटला आहे. तेथील एका गुजराती, मारवाडी आणि जैनबहुल सोसायटीमध्ये राहणाऱ्या आणि मांसाहार करणाऱ्या मराठी कुटुंबाला अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याचे उघड झाले आहे. शाह नावाच्या व्यक्तीने या संबंधित मराठी कुटुंबाला बरंच सुनावलं. ह्यतुम मराठी लोग गंदा है. तुम मच्छी मटण खाते होह्व असे त्याने मराठ कुटुंबाला सुनावल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र हा प्रकार समजताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांनी तेथे धाव घेतली आणि सोसायटीतील सदस्यांना चांगलीच समज दिली. मनसेचे कामगार सेनेचे उपाध्यक्ष राज पार्टे यांनी सोसायटीत शिरून तेथील संबंधित गुजराती आणि जैन रहिवाशांना या घटनेचा जाब विचारत त्यांना खडसावलं. मात्र मराठी कुटुंबाला त्रास देणारी शाह नावाची व्यक्ती समोर आलीच नाही. तर सोसायटीतील इतर रहिवाशांनी मात्र सारवासारव केली. आम्ही मराठी विरुद्ध अमराठी भेदभाव करत नाही, आम्ही मांसाहार खाण्यावर कोणतेही बंधन आणत नाही, असे ते म्हणताना दिसले. काही दिवसांपूर्वीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भय्याजी जोशी यांनी ह्लमुंबईत येणाऱ्या यांनी मराठी शिकलं पाहिजे असे काही नाही. इथे वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. मुंबईतील घाटकोपर परिसराची भाषा ही गुजराती आहे. मुंबईची कुठलीही एक भाषा नाही. इथे अनेक भाषा बोलल्या जातात,ह्व असे वक्तव्य केल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. त्यातच आता त्याच घाटचकोपरमध्ये मराठी कुटुंबाला अपमानास्पद वागणूक मिळाल्याने हा वाद आणखीनच पेटण्याची चिन्हे आहेत.

## नाशिकमध्ये अनधिकृत दर्गा तोडायला सुरुवात

## पोलिसांवर दगडफेक, वाहनांची तोडफोड

**■नाशिक। प्रतिनिधी :**

नाशिकच्या काठे गल्ली परिसरातील अनधिकृत दर्ग्याच्या तोडकामाला आज पहाटेपासून सुरुवात झालेली आहे. आपलं म्हणणं मांडण्यासाठी दर्गा ट्रस्टला दिलेली मुदत आज संपली. त्यामुळे दर्ग्याच्या उर्वरित बांधकामाच्या तोडकामाला सुरुवात झाली आहे. याआधी हाच अनधिकृत दर्गा हटवताना निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता, नाशिक पोलिसांनी काठे गल्ली परिसरात मोठा बंदोबस्त लावला आहे. पोलिसांकडून अतिरिक्त कुमक मागवण्यात आली आहे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याची खबरदारी पोलिसांकडून घेण्यात येत आहे. अनधिकृत दर्ग्याच्या उर्वरित तोडकामाला सुरुवात झाली आहे. काही दिवसांपूर्वी अनधिकृत दर्गा हटवण्याची प्रोसेस सुरु झाली. त्यावेळी धर्मगुरुंनी मध्यस्थी करुन अजून अवधी हवा अशी विनंती केली होती.

१५ एप्रिल रोजी ही मुदत संपल्यानंतर पोलीस बंदोबस्तात महापालिकेकडून तोडक कारवाई सुरु झाली आहे. जिथे ही कारवाई सुरु आहे, तिथे १०० मीटरच्या परिसरात बॅरिकेडींग करण्यात आली आहे. आतमध्ये जायची कोणाला परवानगी नाहीय. आज दुपारपर्यंत हा अनधिकृत दर्गा हटवण्याचं काम पूर्ण होईल. मागच्यावेळी दर्गा हटवण्याची कारवाई सुरु झाली. त्यावेळी दोन्ही बाजूकडून जमाव जमला होता. त्यामुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. आज अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांची अतिरिक्त कुमक मागवण्यात आली आहे.



**मात्र, जमाव ४०० च्या वर होता**

दरम्यान हा दर्गा हटवण्याची कारवाई सुरु होण्याआधी रात्रीच्या वेळी नाशिकच्या काठे गल्ली परिसरात दगडफेक झाली. तीन ते चार पोलीस या दगडफेकीत जखमी झाले आहेत. पाच वाहनांचेही नुकसान झाले आहे. वीजपुरवठा खंडित असल्याचं पाहून जमावाने दगडफेक केली. वादग्रस्त धार्मिक स्थळाबाबत अफवा उडल्यानं तणाव निर्माण झाला होता. रात्रीच्या वेळी ५०० पोलिसांचा बंदोबस्त होता. मात्र, जमाव ४००च्या वर होता. पालिकेने न्यायालयाच्या आदेशाने अनधिकृत दर्ग्याला १ एप्रिलला नोटीस बजावली होती. स्वतःहून अनधिकृत बांधकाम काढून घ्या, अन्यथा तोडकामाचा दिला होता इशारा. नाशिक पोलिसांनी परिसरातील वाहतूक मार्गतही केला बदल.

## आणखी एका हत्येनं बीड हादरलं!

## बीडमध्ये भाजप पदाधिकाऱ्याची भरदिवसा हत्या

**■बीड। प्रतिनिधी :**

बीडमधील जंगलराज कमी होण्या ऐवजी दिवसेंदिवस वाढताना पाहायला मिळत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुखांच्या हत्यानंतर बीडमधील गुंडाराज राज्यासमोर आलं. त्यानंतर एकापाठोपाठ एक अशा बीडमधील गुन्हेगारीच्या समोर येत आहेत. त्यात आता माजलगावमध्ये भाजपच्याच कार्यकर्त्याची हत्या झाल्यानं खळबळ उडाली आहे.

बीड जिल्हा आणखी एका हत्येच्या घटनेनं हादरून गेला आहे. बीडच्या माजलगाव शहरात भाजप पदाधिकारी बाबासाहेब आगे यांची हत्या करण्यात आली आहे. धारदार शस्त्रांनी वार करत आगे यांची हत्या करण्यात आली. बाबासाहेब आगे हे भाजपचे लोकसभा विस्तारक होते. नारायण फपाळ याने आगे यांची हत्या केली आहे. हत्येनंतर नारायण फपाळ हा आरोपी स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाला.

माजलगाव शहरातील वर्दळीच्या स्वामी समर्थ मंदिराजवळ ही हत्या झाली. हत्येनंतर नारायण फपाळ स्वतः पोलीस ठाण्यात हजर होत हत्येची कबुली त्याने दिली. आर्थिक देवाण-घेवाणीतून हत्या झाल्याची प्राथमिक माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.




**बाबासाहेब आगे यांची हत्या कशी झाली?**

बाबासाहेब आगे हे भाजप लोकसभा विस्तारक आहेत. माजलगाव तालुक्यातील किटी आडगाव ग्रामपंचायतीचे ते सदस्य आहेत. नारायण फपाळकडून धारदार शस्त्राने बाबासाहेब आगे यांची हत्या झाली. बाबासाहेब आगे भाजप तालुका अध्यक्ष अरुण राऊतांच्या भेटीला जात असताना त्यांची हत्या करण्यात आली.

## निलंबित अधिकारी रणजीत कासले पोलिसांना शरण जाणार

## धनंजय मुंडेंबाबत नवा गौप्यस्फोट, ‘लवकरच...’

**■बीड। प्रतिनिधी :**

निलंबित आणि वादग्रस्त पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले स्वतः हून पोलिसांना शरण जाणार आहे. त्याने सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करत ही माहिती आहे. वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची मला ऑफर होती असा खळबळजनक गौप्यस्फोट कासले याने केला होता. त्यानंतर राज्यात मोठी खळबळ उडाली होती. याच दरम्यान बीडच्या शिवाजी नगर पोलिसांत अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हाही दाखल झाला आहे. त्यामुळे कसले याच्या अडचणीत वाढ झाली आहे. हेच लक्षात घेता कासले याने एक पाऊल मागे घेत आता बीड पोलिसांना शरण जाणार असल्याचं एका व्हिडिओच्या माध्यमातून सांगितलं आहे. मात्र तो पोलिसांना कधी शरण जाईल हे अद्याप त्याने स्पष्ट केले नाही.

व्हिडीओत रणजीत कासले सांगत आहे की, ‘‘मी कालपासून काही कमेंट वाचल्या. काही पत्रकार मित्र, वकील पोलीस अधिकारी यांच्याशी संवाद साधला. त्यावरुन मला जाणवलं की, पळून उपयोग होणार नाही. कोणत्याही संकटाचा मी सामना केला आहे. त्यानुसार मी या संकटाचा सामना करणार आहे. मी बीड पोलिसांसमोर आत्मसमर्पण करण्याचा निर्णय घेतला आहे. सिस्टीमविरोधात जास्त दिवस लढता येत नाही हे मला जाणवलं आहे. माझे दोन्ही मोबाईल चालू करणार आहे. मला फोन करुन, त्रास देऊ नका. मला मेसेज करा. मी ज्यांच्यावर आरोप केले तेच भाजपात प्रवेश करणार आहे. धनंजय मुंडे आता वॉशिंग मशीनमध्ये क्लीन होऊन बाहेर येणार आहे. यात फक्त माझा बळी जाणार हे माहिती आहे. त्यामुळे मी जे काही होईल त्याला सामोरं जाणार असून, बीड पोलिसांसमोर हजर होणार आहे. त्यांनी मला पकडलं तरी काही हरकत नाही. हजर होऊन लढाई लढतच राहणार. सर्व आरोप सिद्ध करुन दाखवणार’’.

**कोण आहे रणजीत कासले?**

रणजीत कासले हा बीड पोलिसांच्या सायबर विभागात पीएसआय म्हणून कार्यरत आहे. सूरत येथील एका व्यापाऱ्याने आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकरणाचा तपास कासले याच्याकडे होता. तपासादरम्यान त्याने आर्थिक गैरव्यवहार केल्याचा ठपका ठेवत बीडच्या पोलीस अधीक्षकांनी त्याला २६ मार्च रोजी निलंबित केलं. सध्या तो निलंबित असून त्यांची खात्याअंतर्गत चौकशी सुरू आहे.



## भुसावळमध्ये कुत्र्यांची दहशत... वर्षभरात ४ हजार ४७७ नागरिकांना कुत्र्यांचा चावा

**■भुसावळ। प्रतिनिधी :**

भुसावळमध्ये भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत पाहायला मिळतेय. भटक्या कुत्र्यांमुळे भुसावळकरांची घाबरगुंडी उडाली आहे. कधी कुणाला कुठे भटका कुत्रा चावा घेईल याचा काही नेम नाहीये. कारण वर्षभरात भुसावळमध्ये तब्बल ४ हजार ४७७ नागरिकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलाय. म्हणजे दिवसाला १२ ते १३ नागरिकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलाय. जळगावच्या भुसावळमध्ये भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत पाहायला मिळतेय. भटक्या कुत्र्यांच्या दहशतीमुळे नागरिकांना अक्षरक्षा जीव मुठीत घेऊन वावरावं लागतंय.. याचं कारण म्हणजे शहरात वाढलेल्या भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याच्या घटना. शहरात मोकाट कुत्र्यांचा प्रश्न गंभीर झाला आहे. प्रमुख रस्ते आणि सर्वच भागांमध्ये कुत्र्यांच्या टोळ्या धुमाकूळ घालतायत. भुसावळमध्ये वर्षभरात तब्बल ४ हजार ४७७ जणांना भटक्या कुत्र्यांने चावा घेतला आहे. त्यामुळे भुसावळमध्ये दिवसाला १२ ते १३ नागरिकांना भटके कुत्रे चावा घेताहेत. भटक्या कुत्र्यांचा शहरात एवढा धुमाकुळ सुरू असताना नगर परिषद प्रशासन काय करतंय हा प्रश्न उपस्थित होतोय. मात्र नगर परिषद प्रशासनाचं या भटक्या कुत्र्यांच्या त्रासाकडे लक्ष नाही आहे.

**भुसावळमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत**

भुसावळमधील नागरिक भटक्या कुत्र्यांच्या दहशतीत असून दिवसाला सरासरी १२ ते १३ जणांवर कुत्र्यांचा हल्ला होतो. लहान मुलांना चावा घेतल्याच्याही अनेक घटना समोर आल्या आहेत. भटक्या कुत्र्यांच्या त्रासाकडे पालिकेचं दुर्लक्ष होत असून मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण दोन महिन्यांपासून रखडलंय. भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणासाठी ३० लाखांचा निधी मंजूर असून निर्बिजीकरणाचं ठेकेदाराला दिलेलं काम तांत्रिक अडचणीमुळे रखडलं आहे.



## मूल होत नाही म्हणून तहसीलदाराचा अभद्र प्रकार

## केलं असं काही की तुम्हाला येईल प्रचंड संताप, बायकोसोबत...

**■नांदेड। प्रतिनिधी :**

उच्चपदावर कार्यरत असलेले अधिकारी हे सुशिक्षित असतात. सामाजिक दृष्टीने ते परिपक्व असतात, असं म्हटलं जातं. महिला तसेच समाजातील वेगवेगळ्या वंचित घटकांच्या कल्याणासाठी प्रयत्नरत राहणे हे या अधिकाऱ्यांचे आद्य कर्तव्य असते. अनेक कार्यकर्त्यांनी सर्वांना आदर्श ठरावी अशी कामगिरी करून दाखवलेली आहे. मात्र काही अधिकारी मात्र याला अपवाद असतात. काही अधिकारी तर असे काही कारनामे करून बसतात, की ते समोर आल्यानंतर सर्वांच धक्का बसतो. असाच एक प्रताक नांदेडमधील एका तहसीलदाराने करून दाखवला आहे. या तहसीलदाराने मूल होत नाही म्हणून आपल्याच पत्नीवर अन्वनित अत्याचार केले आहेत. पत्नीच्या तक्रारीनंतर या तहसीलदाराला पोलिसांनी अटक केलं आहे. तहसीलदाराने पत्नीच्या कानशीलावर बंदूक लावल्याच्या आरोप तक्रारदार पत्नीने केला आहे. गेल्या काही दिवसांपासून या पती-पत्नीमध्ये वाद सुरू होते. पैशाची मागणी करणे, मानसिक त्रास देऊन अनैसर्गिक कृत्य करण्यास जबरदस्ती करणे, मुलबाळ होत नाही म्हणून पत्नीला त्रास देणे, असे आरोप तहसीलदार अविनाश शेंबटवार यांच्यावर त्यांच्या पत्नीने केले आहेत. याबाबत पीडित पत्नीने माहेरी आल्यानंतर तहसीलदार पतविरुद्ध नांदेडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. तहसीलदार अविनाश शेंबरवाड नांदेड येथे आले असता पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. दीड वर्षांपूर्वीच त्यांचा विवाह झाला होता.




**नेमकं काय घडलंय?**

नांदेडमधील एका तहसीलदाराने आपल्या पत्नीचा छळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. खुद्द दहसीलदाराच्या पत्नीनेच पोलीस ठाण्यात धाव घेत तशी तक्रार केली आहे. या तक्रारीनंतर पोलिसांनी तहसीलदाराला अटक केली आहे. दाखल तक्रारीनुसार आरोपी तहसीलदाराने पत्नीच्या कानशिलावर बंदूक ठेवली. तसेच मुलबाळ होत नाही म्हणून तहसीलदार पतीने त्याच्या पत्नीचा छळही केला आहे. अविनाश शेंबटवर असं या तहसीलदाराचं नाव असून ते चंद्रपूर जिल्ह्यात कार्यरत आहेत. तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी अविनाश शेंबटवर यांना नांदेडमधील सासरवाडीत आल्यानंतर अटक केली आहे. याच तहसीलदाराने पत्नीला शारीरिक मानसिक व आर्थिक स्वरुपाचा छळ केल्याचाही आरोप आहे.

## तरुणाला नग्न करुन हत्या करणारा सिंधुदुर्गचा आका कोण? वैभव नाईकांच्या आरोपांनी खळबळ

**■सिंधुदुर्ग। प्रतिनिधी :**

बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरण ताजं असतानाच सिंधुदुगार्तूनदेखील एक धक्कादायक घटना समोर आलीय. एका तरुणाला नग्न करुन त्याची हत्या करण्यात आलीय. ठाकरेंच्या शिवसेनेचे माजी आमदार वैभव नाईकांनी यासंदर्भातली एक पोस्ट फेसबूकवर शेअर केलीय. वैभव नाईकांचे आरोप काय जाणून घेऊया.

**प्रकाश बिडवलकर हत्या प्रकरण काय आहे?**

कुडाळ तालुक्यातील चेंदवन गावातील प्रकाश बिडवलकरचे पैसे देत नसल्याच्या रागातून मार्च २०२३ ला अपहरण करण्यात आले होते. अपहरण केल्यानंतर त्याला एका आरोपीच्या घरात डांबून बेदम मारहाण करण्यात आली. यामध्ये सिद्धिविनायके उर्फ प्रकाश बिडवलकरचा मृत्यू झाला होता. मयत प्रकाश बिडवलकर याला सातार्डा येथील जंगल भागातील स्मशानभूमीत जाळलं. त्यानंतर प्रकाशची राख आणि हाडे तेरेखोल नदीत टाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. हत्या प्रकरणाचा आता दोन वषार्नंतर उलगडा लागला आहे. त्यानंतर कुडाळ पोलिसांनी संशयित चार आरोपींना अटक केलीय. आर्थिक कारणावरुन केलेल्या मारहाणीत प्रकाशचा मृत्यू झाला असल्याची प्रतिक्रिया एसपी सौरभ कुमार यांनी दिली आहे.

बीड हत्या प्रकरणापेक्षा सिंधुदुर्गमधील हत्या प्रकरण गंभीर असल्याचं संजय राऊतांनी म्हटलंय. या प्रकरणाची उद्धव ठाकरेंसोबत चर्चा करुन कौकणाचा दौरा करणार असल्याचंही राऊतांनी सांगितलं.

एकीकडे बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणावरुन राज्याचं राजकराण चांगलंच तापलंय. या प्रकरणातील आरोपी अटकेत असून त्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात येतेय. तर दुसरीकडे प्रकाश बिडवलकर प्रकरणही गंभीर असून या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला अटक करण्याची मागणी वैभव नाईकांनी केलीय.



**वैभव नाईकांचे आरोप काय?**

सिंधुदुर्गमधील बिडवलकर नावाच्या तरुणाची २२ हजारांसाठी हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणातील शिवसेनेचा तो आका कोण?, असा सवाल वैभव नाईकांनी केला आहे.बिडवलकर हत्या प्रकरणाच्या सखोल चौकशी करावी अशी मागणी वैभव नाईकांनी केली आहे. तसंच, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील परिस्थिती बीडपेक्षा गंभीर असल्याचा आरोप नाईकांनी केला आहे. 'हत्या करणारा आरोपी शिवसेनेचा पदाधिकारी, स्थानिक आमदारांकडून आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न असून हत्या प्रकरणात पोलिसांवर दबाव असल्याचा आरोप वैभव नाईकांनी केला आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# काँग्रेस कात टाकणार

राज्यात या वर्षाच्या अखेरीपर्यंत विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. त्यातही सर्व राजकीय पक्षांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची आहे ती, मुंबई महानगरपालिका निवडणूक. त्यादृष्टीने सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन प्रादेशिक पक्षांत दुफळी होऊन सध्या त्यांच्यातच कुरघोडीचे राजकारण सुरू आहे. अशावेळी काँग्रेसने मात्र राष्ट्रीय पातळीवरचेच धोरण राज्यातही कायम ठेवल्याचे दिसते. याची सुरुवात काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी महाराष्ट्रातील नेतृत्वापासूनच केली आहे. राज्यात नोव्हेंबर महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठा पराभव स्वीकारावा लागला. परिणामी, आमदार नाना पटोले यांनी दिलेला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा राहुल गांधी यांनी स्वीकारला आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये विदर्भातील बुलढाण्याचे माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती जाहीर केली. हर्षवर्धन सपकाळ हे राहुल गांधी यांचे निकटवर्तीय मानले जातात. माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात तसेच यशोमती ठाकूर अशी नावे चर्चेत असताना हर्षवर्धन सपकाळ यांचे नाव पुढे आणून पक्षनेतृत्वाने सर्वांनाच धक्का दिला. शेतकरी कुटुंबातून आलेले हर्षवर्धन सपकाळ हे गाडगे महाराज, तुकडोजी महाराज तसेच गांधीवादी सर्वोदयी कार्यकर्ता म्हणून परिचित आहेत. हर्षवर्धन सपकाळ काँग्रेसच्या राजीव गांधी पंचायतराज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या विचारधारेवर आधारित ग्रामस्वराज्य निर्मितीत त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. तथापि, कोणत्याही बड्या पदामुळे येणाऱ्या वलयापासून स्वतःला दूर ठेवणाऱ्या हर्षवर्धन सपकाळ यांच्या नियुक्तीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. पक्षाचे ज्येष्ठ नेते तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कायम लक्ष्य केले आहे. त्याप्रमाणेच हर्षवर्धन सपकाळ यांनीही तेच धोरण कायम ठेवले आहे. त्यांनी भाजपसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर वारंवार निशाणा साधला आहे. जवळपास रोजच हर्षवर्धन सपकाळ भाजपवर टीकास्त्र सोडत असल्याचे पाहायला मिळत आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस आणि मुघल सम्राट औरंगजेब या दोघांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यावरून वादंग निर्माण झाला होता. औरंगजेबाचा कारभार आणि देवेंद्र फडणवीस यांचा कारभार सारखाच आहे, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी केली होती. विशेष म्हणजे, विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना तसेच औरंगजेबाच्या थडग्यावरून वाद सुरू असतानाच त्यांनी हे वक्तव्य केल्याने भाजप आक्रमक झाली होती. मात्र, हर्षवर्धन सपकाळ यांनी नमते घेतले नाही. उलट, मी कुठेही देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत अपशब्द वापरले नाहीत. त्यांचा एकेरी उल्लेखही कधी केलेला नाही. मी फक्त त्यांच्या राज्यकारभारावर टीका केली, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. त्याचबरोबर, बीड प्रकरणावरून फडणवीस यांनी गृहमंत्रीपद सोडावे आणि या खात्यासाठी राज्याला पूर्णवेळ मंत्री द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. याच थडग्यावरून नागपूरमध्ये झालेल्या दंगलीनंतर सत्यशोधन समिती स्थापन करून त्याचा अहवाल तयार करण्याचे कामही त्यांच्याच नेतृत्वाखाली झाले. यापुढील काळात काँग्रेसची राज्यातील राजकीय भूमिका काय असेल, याची प्रचिती नव्या प्रदेशाध्यक्षांनी अवघ्या दोन महिन्यांत दिली. त्याचबरोबर त्यांनी सर्वसामान्य कार्यकर्ते तसेच पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्यास सुरुवात केली. यासाठी त्यांनी राज्यभरात दौरे सुरू केले आहेत. याशिवाय, राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील मतदारांच्या संख्येतील कथित घोटाळ्याला वाचा फोडताना, सपकाळ यांनीही हा मुद्दा राज्यात लावून धरला. याशिवाय, शेतकऱ्यांचे प्रश्नही त्यांनी लावून धरले आहेत. काँग्रेसने राज्यासाठी हर्षवर्धन सपकाळ हा नवा भिडू नेमल्यानंतर गुरुवारी काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या मार्गदर्शनाखाली या नव्या डावाला सुरुवात करण्यात आहेत. मुंबईतील काँग्रेस प्रदेश कार्यालयामध्ये गुरुवारी बोलावलेल्या बैठकीला काँग्रेसचे सर्व नेते उपस्थित राहणार आहेत. यावेळी नवी कार्यकारिणी निवडण्यात येणार असून त्यात तरुण आणि अन्य मान्यवरांचा समावेश करून पक्षाचे संतुलन कायम ठेवण्याचा प्रयत्न प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा राहील. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गेल्या महिन्यात गुजरात दौऱ्यात केलेल्या वक्तव्यालाही विशेष महत्त्व आहे. गुजरात काँग्रेसमध्ये दोन प्रकारचे नेते आहेत. एक आहेत, जे काँग्रेसची विचारधारा मानणारे आहेत आणि म्हणून जनतेबरोबर उभे आहेत. तर, दुसरे जनतेपासून दूर आहेत आणि अर्धे भाजपशी हातमिळवणी केलेले आहेत, असे त्यांनी म्हटले होते. राज्यातही काँग्रेसमधील काही बडे नेते राजकीय व्यासपीठावर भाजप, विशेषतः फडणवीस यांच्यावर घणाघाती टीका करत असले तरी, त्यांच्याशी ते संधान साधून असल्याचे सांगण्यात येते. आता काँग्रेस नेतृत्वाने हर्षवर्धन सपकाळ यांची प्रदेशाध्यक्षपदासाठी निवड केल्यानंतर सपकाळ याचे भान ठेवून या नियुक्त्या करतील, एवढे निश्चित. स्पष्टच सांगायचे झाले तर, पक्षात राहून भाजपची बी टीम बनलेल्या नेत्यांना हुडकून त्यांना बाजूला सारण्याची जबाबदारीही बहुदा पक्षनेतृत्वाने दिली असावी. गुरुवारी निवडलेल्या नव्या कार्यकारिणीच्या सदस्यांवरून तसे काही घडते का, हे स्पष्ट होईलच.

# आणखी एक संकल्पपूर्ती

**२६/११चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला हा स्वतंत्र भारताच्या सुरक्षेवरील मोठा आघात होता. या हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याला अमेरिकेतील कायदेशीर लढाईनंतर अखेर भारतात प्रत्यार्पित करण्यात आले आहे. मोदी सरकारच्या सातत्यपूर्ण राजनैतिक प्रयत्नांचा हा मोठा विजय मानला जात आहे. राणाच्या अटकेमुळे हल्ल्यात हौतात्म्य पत्करलेल्या जवानांचे बलिदान सार्थ ठरणार आहे. हे प्रत्यार्पण केवळ न्याय मिळवण्याचे पाऊल नसून, देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृढतेचे प्रतीक ठरले आहे.**

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेला दहशतवादी हल्ला ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील भळभळती जखम आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी. अशा महानगरावर मूठभर अतिरेक्यांनी हल्ला चढवून या शहराला पाच-सहा दिवस अक्षरशः वेठीस धरले होते. मूठभर अतिरेक्यांपुढे केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या पोलीस आणि सुरक्षा, गुप्तचरविषयक यंत्रणा हतबल झाल्या होत्या. या हल्ल्याची पूर्वसूचना आपल्या गुप्तचर यंत्रणांना मिळूनही हा हल्ला रोखण्यासाठी या यंत्रणांनी आवश्यक त्या उपाययोजना का केल्या नाहीत, या अतिरेक्यांना ताज हॉटेलमधून हुसकावून लावण्यासाठी देशाच्या सुरक्षा यंत्रणा तातडीने कार्यरत का होऊ शकल्या नाहीत.

सुरक्षा यंत्रणा, गुप्तचर खाते, पोलीस विभाग यांच्यात आवश्यक समन्वय का नव्हता, अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरातून त्यावेळच्या केंद्रातील आणि राज्यातील काँग्रेस सरकारचे नाकर्तेपण पुढे आले. मुंबई हल्ल्यानंतर तत्कालीन हवाई दल प्रमुख फाली होमी मेजर यांनी पाकिस्तानातील अतिरेक्यांच्या तळांवर हल्ले चढविण्याची सूचना केली होती; मात्र त्यावेळच्या काँग्रेस सरकारने मेजर यांची ही सूचना स्वीकारली नाही. या हल्ल्याने भारताची संपूर्ण जगात नाचक्की झाली. या हल्ल्यात मोठा सहभाग असलेल्या तहव्वूर राणा या ६४ वर्षीय पाकिस्तानी वंशाच्या कॅनेडियन नागरिकाला नुकतेच भारतात आणण्यात आले. तहव्वूर राणाला अमेरिकेच्या ताब्यातून भारतात आणण्यासाठी मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत राजनैतिक पातळीवर अव्याहत प्रयत्न केले. या प्रयत्नांना राणाच्या प्रत्यार्पणाने अखेर यश आले आहे. मोदी सरकारच्या मुत्सद्देगिरीचा हा मोठा विजय आहे. राणाची अटक ही अमेरिकेतील दीर्घ कायदेशीर लढाईमुळे शक्य होऊ शकली. प्रत्यार्पण टाळण्यासाठी




राणाने अमेरिकेतील विविध न्यायालयांमध्ये अपील केले होते. भारताने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयातही सर्व कायदेशीर मार्गांचा आधार घेत बाजू मांडल्यामुळे भारताच्या बाजूने अमेरिकेच्या न्यायालयाने निकाल दिला. मोदी सरकारने केलेल्या अनेक संकल्पांपैकी एकाची पूर्ती राणाच्या अटकेने झाली आहे. या हल्ल्यावेळी हौतात्म्य पत्करलेल्या तुकाराम ओंबळे, संदीप उन्निकृष्णन आदी वीरांचे बलिदान राणाच्या अटकेमुळे सार्थकी लागले आहे.

२००४-२०१४ या काळात मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे सरकार सत्तेत असताना पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी संपूर्ण देशभरात थैमान घातले होते. बॉम्बस्फोट नित्याचे झाले होते. केंद्राची सुरक्षा यंत्रणा दहशतवाद्यांना रोखण्यात सपशेल अपयशी ठरली होती. पाकिस्तानी दहशतवाद्यांनी तेव्हा कोठेही बॉम्बस्फोट घडवून आणावेत आणि मनमोहन सिंग सरकारने त्याकडे असहाय्यतेने पाहत रहावे, असे चित्र २००४ ते २०१४ या दहा वर्षांत अनेकदा दिसले. याचा कळस २६ नोव्हेंबर २००८ रोजी चढवला गेला. २०१४ नंतर मोदी सरकारने देशाची अंतर्गत सुरक्षा आणि गुप्तचर यंत्रणा कार्यक्षम बनवून पाकिस्तानी दहशतवाद्यांचे दहशतवादी हल्ल्याचे अनेक प्रयत्न उधळून लावले. अतिरेक्यांनी केलेल्या दोन हल्ल्यांना सर्जिकल स्ट्राइक आणि एअर स्ट्राइकच्या रूपाने खणखणीत उत्तर दिले गेले. बलशाली देश कसा असतो, याची प्रचिती मोदी सरकारने जगाला आणून दिली. आता भारतात घुसून बॉम्बस्फोट करणे, हल्ले करणे पाकिस्तानी दहशतवाद्यांना अशक्य झाले आहे. एकीकडे अंतर्गत सुरक्षा बळकट करून आणि गुप्तचर यंत्रणा कार्यक्षम करून मोदी सरकारने अतिरेक्यांचे अनेक संभाव्य हल्ल्यांचे प्रयत्न उधळून लावले.

त्याचबरोबर मुंबई हल्ल्याला जबाबदार असलेल्या तहव्वूर राणाचा भारताला ताबा कसा मिळेल, यासाठी मोदी सरकारने आपली कुटनीतीपणाला लावली होती. भारत आणि अमेरिका यांच्यात १९९७मध्ये गुन्हेगारांचे प्रत्यार्पण करण्यासाठी करार झाला. या करारानुसारच राणाला भारताच्या स्वाधीन करणे अमेरिकेला भाग पडले आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले होते. या आरोपपत्रात पोलिसांनी तहव्वूर राणा हा मुंबईवरील हल्ल्याचा सूत्रधार होता, असे नमूद करण्यात आले आहे. ४१५ पानांच्या या आरोपपत्रात तहव्वूर राणा आणि डेव्हिड हेडली या दोघांनी मुंबईत पाकिस्तानी अतिरेकी घुसवून वेगवेगळ्या ठिकाणी कसे हल्ले चढवले. याचा तपशीलवार उल्लेख आहे.

अजमल कसाब आणि अन्य अतिरेक्यांनी मुंबईवर केलेल्या हल्ल्यात सहा अमेरिकन नागरिकांसह १६६ जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्यातील सहभाग स्पष्ट झाल्यानंतर भारताने अमेरिकेकडे दहा जून २०२० रोजी राणाच्या अटकेची अधिकृत मागणी केली होती. एखाद्या अमेरिकन नागरिकाला अमेरिकन न्यायालयाने भारताकडे सुपूर्द करण्याची घटना स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथम घडली आहे. राणाला आता 'एनआयए'च्या कोठडीत ठेवण्यात आले आहे. २६/११च्या दहशतवादी हल्ल्यामागील अनेक देशी-विदेशी शक्तींचा असलेला सहभाग राणा उघड करू शकतो. तसे झाले, तर मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या मागे असणारे अनेक दृश्य-अदृश्य हात बेनकाब होणार आहेत. डिसेंबर २०२४पर्यंत भारताने ४८ राष्ट्रांबरोबर प्रत्यार्पण करार केले आहेत. देशातील दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या १७८ देशांना प्रत्यार्पणासाठी विनंती करण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. राणा याला प्रत्यार्पणाद्वारे भारतात आणण्याच्या कामी ज्येष्ठ वकील दयान कृष्णन् यांनी मोठे योगदान दिले. राणाच्या अटकेनंतर आपल्या सख्ख्या शेजाऱ्यांनी म्हणजे पाकिस्तानने तहव्वूर राणाशी आपला कसलाच संबंध नसल्याचे म्हणत हात झटकले आहेत.

देशाला सामर्थ्यशाली बनवून अतिरेकी शक्तींना वेसण घालण्याचे गेल्या ११ वर्षांत आपण अनेकदा अनुभवले आहे. आता उपलब्ध सर्व पुराव्यांचा यथोचित वापर करत राणाला शिक्षा सुनावण्यापर्यंत प्रक्रिया पार पाडली जाईल, यात शंका नाही. दहशतवाद कोणत्याही स्थितीत सहन केला जाणार नाही, हे मोदी सरकारने पुन्हा दाखवून दिले आहे.

# 'नापाक' खलनायक कचाट्यात

मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या कटातील एक खलनायक तहव्वूर राणाचे अमेरिकेकडून प्रत्यार्पण होणे, हे भारताचे मोठे राजनैतिक यश आहे. त्यामुळे या खटल्यातील आणखी एका गुन्हेगार कायद्याच्या कचाट्यात आला असून, या हल्ल्यातील पाकिस्तानचा सहभाग जगासमोर आणण्याची मोठी संधी भारताला मिळाली आहे. साऱ्या जगाला हादरवून टाकणाऱ्या या निर्घृण हल्ल्यात १६६ जणांचा बळी गेला आणि सव्वादोनशे जण जखमी झाले होते. तपास यंत्रणांनी यामागील धागेदोरे शोधून पाकिस्तानी दहशतवादी संघटना 'लष्कर ए तैयबा', तेथील गुप्तहेर संस्था 'इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स' (आयएसआय) यांचा सहभाग असल्याचे अनेक पुरावेही दिले. या हल्ल्याचा कट रचण्याच तहव्वूर राणाचा सहभाग होता, त्याने सुरू केलेल्या संस्थेचा कर्मचारी म्हणूनच डेव्हिड हेडली या आरोपीने मुंबईत मोक्याच्या ठिकाणांची टेहळणी केली होती. मूळ पाकिस्तानी लष्करातील डॉक्टर राणा कॅनडाचा नागरिक झाला. अमेरिकेत व्यवसायाच्या आडून तो दहशतवादी कारवायांना रसद पुरवत होता. अमेरिकेच्या तुरुंगात असलेल्या राणाचे प्रत्यार्पण व्हावे, यासाठी भारतीय यंत्रणा बराच प्रयत्न करीत होत्या; मात्र अमेरिकी न्यायालयात त्याविरोधात याचिका करून राणा चालढकल करण्याच्या प्रयत्नांत होता. अखेर अमेरिकी न्यायालयाने त्याची याचिका फेटाळली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच झालेल्या अमेरिका भेटीत अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी चर्चेत हा विषय उपस्थित केला, तसेच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनीही अमेरिकी यंत्रणांशी चर्चा केली होती. त्या पार्श्वभूमीवर भारतात आणलेल्या राणाची दिल्ली न्यायालयाने राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या कोठडीत रवानगी केली आहे. त्याच्या चौकशीत या हल्ल्याबाबत आणखी नवे तपशील समोर येऊन, या हल्ल्याचा कट जिथे शिजला, त्या पाकिस्तानचा 'नापाक' सहभाग जगासमोर उघड होऊ शकतो. राणाच्या प्रत्यार्पणाच्या मुद्द्यावरून सुरू असलेले श्रेयवादाचे राजकारण दुर्दैवी आहे.



# कपातीमागील 'अर्थ'!

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पामध्ये राज्याच्या आर्थिक प्रगतीचे स्वप्न रंगवून महिनाही लोटला नाही; तोवरच या चित्रावरचे गुलाबी रंग उडाले आहेत. अर्थसंकल्पामध्ये केलेल्या वार्षिक तरतुदींच्या केवळ साठ टक्के निधीच वितरित करण्याबाबतच्या अर्थ खात्याच्या नव्या परिपत्रकाने सक्तीच्या बचतीचा आदेश सर्व विभागांना दिला आहे. त्यातून राज्याची खालावलेली आर्थिक स्थिती आणि तिजोरीवरचा वाढत चाललेला भार यांची कल्पना येते. गेल्या महिन्यात अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर, कोणी अधिक निधी खेचला, याबाबतची चर्चा रंगली होती; पण तेव्हा विजयी मुद्रेने वावरणाऱ्या अनेक मंत्र्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद नव्या परिपत्रकाने मावळला असणार. त्यासोबतच आमदार निधी आणि जिल्हा वार्षिक निधीलाही कात्री लागणार असल्याने प्रत्येक जिल्ह्यात आखलेल्या योजनांसाठी निधीच्या तोंडमिळवणीचे आव्हान उभे राहणार आहे. या परिपत्रकानुसार, अर्थ खात्याने तुलनेने दुय्यम खर्चांना चाप लावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मोटार वाहनांची खरेदी, परदेशी प्रवासाचा खर्च, प्रशासकीय खर्च, प्रसिद्धी, प्रकाशने, जाहिराती आणि संगणक अशा खर्चांना ठोस कारणांशिवाय मान्यता देऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. केंद्र सरकार पुरस्कृत योजनांमधील राज्याचा वाटा आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या तरतुदी पूर्ण करणे सरकारला भागच आहे. मात्र, अनेक अनुदाने, शिष्यवृत्ती, तसेच भांडवली खर्चाच्या विकासयोजना अशा आवश्यक खर्चांमध्ये काटछाट होणार नाही, याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. राज्य सरकारच्या या आदेशाची योग्य अंमलबजावणी झाली, तर काही गोष्टी व्यवस्थेच्या पथ्यावरच पडणाऱ्या आहेत. यंत्रणेतील अनावश्यक खर्चांना कोठे तरी चाप लावणे गरजेचे होतेच; पण विविध विभागांमधील या उधळपट्टीवरच जगणाऱ्या अनेकांची यामुळे आबाळ होणार! अनावश्यक वाहने, संगणक, कार्यालयीन सजावट यांपासून ते स्टेशनरीपर्यंत प्रत्येक खरेदीमध्ये हात मारणारे ठेकेदार, त्यातील मलई खाणारे अधिकारी यांच्या टोळ्यांचे व्यवहार कदाचित थांबू शकतात. त्याप्रमाणेच उठसूट प्रत्येक लहानमोठ्या गोष्टींची जाहिरातबाजी करणाऱ्या 'चमको' मंडळींनाही लगाम बसू शकतो. सोबतच सर्व विभागांना वार्षिक खचार्चे नियोजन करण्याचेही सरकारने बजावले आहे. वर्षभर निवांत रहायचे आणि फेब्रुवारी-मार्चमध्ये तरतुदी संपविण्यासाठी वाघ मागे लागल्यासारखे खर्च करण्याची अनागोंदी यातून थांबू शकेल. खरे तर राज्य सरकारने हीच संस्कृती स्थानिक स्वराज्य संस्थांनाही बंधनकारक केली पाहिजे, त्यातून किमान मार्चमध्ये खचार्चे उद्दिष्ट गाठण्यासाठी सारी शहरेच खणून ठेवल्याचे चित्र तरी पाहावे लागणार नाही. कल्याणकारी योजनांचा राज्याच्या तिजोरीवर आलेला ताण आणि आर्थिक वास्तव-भविष्याचे आलेले भान, हे सरकारच्या आदेशामागील खरे कारण आहे. राज्याच्या अर्थसंकल्पातला मोठा वाटा 'लाडकी बहीण' योजनेवर खर्च होत आहे. गेल्या वर्षी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केल्यानंतर यंदा ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद त्यासाठी करण्यात आली आहे. नव्याने लाभार्थींची कठोर छाननी आणि दुहेरी योजनांच्या लाभार्थींना वगळण्यासारख्या मार्गांनी त्यात थोडीफार बचत होऊ शकते. त्याचबरोबर पूर्वीच्या घोषणेनुसार मिळू शकणारे दरमहा २१०० रुपये आता विसरा, असा संदेशही नव्या परिपत्रकात दडला आहे. हा खर्च दीर्घ काळ पेलवणे सरकारला जवळपास अशक्य आहे. मात्र, त्याची कबुली देणे राजकीयदृष्ट्या परवडणारे नसल्याने सरकार सापळ्यात अडकले आहे. दुसरीकडे सध्या राज्यावरील पावणेआठ लाख कोटी रुपयांचे कर्ज यंदा नऊ लाख कोटी रुपयांवर जाण्याची शक्यता असून, त्याची व्याजासह परतफेड करताना सरकारची दमछाक झालेली दिसते. उत्पन्नापेक्षा खर्च अधिक झाल्याने महसुली तुटीचा सामना करावा लागत आहे; त्याबरोबरच कर संकलनात अपेक्षित वाढ न होणे, हे चिंतेचे आणखी एक कारण. अमेरिकेसह जगभरात होणाऱ्या घडामोडी पाहता विकासाला खीळ बसून मंदीसदृश स्थितीची चाहूल लागली आहे. त्यातून उद्योग व सेवाक्षेत्राची वाढ मंदावली, तर त्याचा परिणाम करसंकलनावरही होणार आहे. प्राथमिक अंदाजानुसार यंदा सरासरीइतका पाऊस राहण्याची शक्यता असल्याने खरीप चांगला झाला, तर सकारात्मक परिणाम दिसतील. वस्तू व सेवाकराची रचना लागू झाल्यानंतर राज्य सरकारच्या उत्पन्नाचे मार्ग आक्रसले असून, सध्याच्या निधीवाटपाच्या निकषांमुळे केरळ, तमिळनाडू या राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रालाही कमी निधी मिळत असल्याची तक्रार आहे. सारे जग एका संक्रमणातून प्रवास करीत असताना राज्याचे आर्थिक आरोग्य ठीकठाक नसल्याचे निदान तर झाले; पण अशा मार्गांनी तात्पुरती मलमपट्टी करण्यापेक्षा कठोर राजकीय निर्णयांचे कडू औषध सरकार देणार का, हा खरा प्रश्न आहे.

# राज्यपालांना कळसूत्री बाहुले बनविण्याला प्रतिबंध!

तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांच्या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टच म्हटले आहे की, राज्यपालांनी अवैध काम केले आहे. देशात प्रथमच विधिमंडळात मंजूर झालेली १० विधेयके ही राज्यपालांच्या स्वाक्षरीने नाही तर सर्वोच्च न्यायालयाच्या नोटीफिकेशनने मंजूर करण्यात आली. न्यायालयाने राज्यपालांसह राष्ट्रपती भवनालाही कोणतेही विधेयक हे तीन महिन्यांच्या आत मंजूर करावे किंवा परत विधिमंडळाकडे पाठवण्याचे आदेश दिले.

हा देशाच्या इतिहासातील ऐतिहासिक निर्णय आहे. सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतरही आर. एन. रवी यांनी तामिळनाडू सरकारकडे विधेयके परत पाठवली. ते का परत पाठवत आहेत, हे लिहिण्याची तसदीदेखील राज्यपालांनी घेतली नाही. यावरुन सर्वोच्च न्यायालयाने अधिकच संताप व्यक्त केला आहे.

तामिळनाडूमधील राज्य सरकार आणि या सरकारचे सर्वेसर्वा एम. के. स्टॅलिन केंद्र सरकारविरोधात भांडत आहेत तेवढा विरोध गेल्या १०-११ वर्षांत कोणत्याच मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारचा केला नसेल. केंद्र सरकारविरोधातील लढाईत स्टॅलिन सध्या क्रमांक एकवर आहेत. ममता बॅनर्जी, हेमंत सोरेन, भगवंत मान यांसारखे बिगरभाजप मुख्यमंत्री ज्या ज्या राज्यात आहेत, तिथे हा वाद गेल्या दशकभरात उफाळून येताना दिसत आहे. सर्वोच्च न्यायालयाने या वादावरुन राज्यपालांना खडे बोल सुनावले आहेत.


तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी राज्य सरकारने मंजूर केलेली १० विधेयके अडवून ठेवली होती. राज्यपालांचे हे कृत्य संविधानविरोधी असल्याचे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने आर.एन. रवी यांना फटकारले. या सर्वोच्च खरडपट्टीनंतर केंद्र सरकार राज्यपालांना पदावरुन दूर करेल, त्यांची कृती घटनाबाह्य आहे म्हणून त्यांचे अधिकार काढून घेईल किंवा किमान राष्ट्रपती भवनामार्फत त्यांना समज दिली जाईल, अशी भाबडी आशादेखील नाही. उलट जे राज्यपाल राज्य सरकारला त्रास देण्यात सर्वोच्च स्थान मिळवतील, त्यांना उपराष्ट्रपतीपदापर्यंतची बक्षिसी मिळण्याची गॅरंटी आहे.

ताजे प्रकरण हे तामिळनाडूशी निगडित आहे. राज्यपाल रवी यांनी स्टॅलिन यांच्या विधेयकांची अडवणूक करुन राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील संबंधावर भाष्य करण्याची वेळ सर्वोच्च न्यायालयावर आणली. यामुळे एक बरे झाले, आता राज्यपाल आणि राष्ट्रपती यांना कोणतेही विधेयक किती दिवस, महिने रोखून धरता येईल याचे स्पष्ट निर्देशच दिले आहेत. न्यायालयाकडून संविधानातील सर्व घटकांचे अधिकार आणि मयार्दाच स्पष्ट करण्यात आल्या.

संविधानातील कलम १६३ नुसार राज्यपालांनी राज्याच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार काम करणे गरजेचे आहे. अपवादात्मक परिस्थितीतच त्यांनी विवेकाधीन अधिकारांचा वापर करायचा असतो. मात्र अपवादालाच नियम बनवण्याचे काम भाजपविरोधी सरकारे असलेल्या राज्यात गेल्या दशकभरात होताना दिसत आहे.

संविधानातील अनुच्छेद २०० नुसार विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकाला राज्यपाल संमत किंवा नकार देऊ शकतात किंवा राष्ट्रपतींच्या विचारांसाठी रोखून धरू शकतात. याच अधिकारांचा गैरवापर राज्यपाल आर. एन. रवी यांनी केल्याचे ताशेरे सर्वोच्च न्यायालयाने ओढले. राज्यपाल हे स्वतंत्र नसून त्यांनी राज्य सरकारच्या सल्ल्यानुसारच काम करायचे असते, हे संविधानाला अपेक्षित असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

पश्चिम बंगालचे तत्कालीन राज्यपाल जगदीप धनखड, महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, केरळचे तत्कालीन राज्यपाल आरिफ मोहम्मद खान, पंजाब आणि दिल्लीचे नायब राज्यपाल, झारखंडमध्ये हेमंत सोरेन विरुद्ध तत्कालीन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन या सर्वांनीच मुख्यमंत्र्यांच्या अधिकारात ढवळाढवळ केली. जे



केंद्र आणि राज्य सरकारचे संबंध हे विळ्या-भोपळ्यासारखे नाहीत. राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांचे तर मुळीच नाहीत. भारतीय संविधानाने सर्वच बाबतीत चेक अँड बॅलेन्स अशी रचना दिलेली आहे. राज्य सरकारे जर संविधानाच्या चौकटीबाहेर जाऊन काही करत असतील तर त्यांना त्यापासून परावृत्त करण्यासाठी राज्यपाल ही एक संवैधानिक व्यवस्था आहे. केंद्र सरकारनेदेखील संविधानाच्या मर्यादेतच कार्य केले पाहिजे. राज्यपालांच्या कृत्याला असंवैधानिक ठरवण्याची वेळ सर्वोच्च न्यायालयावर येत असेल तर राज्यपाल पदासाठी ते शोभनीय नाही.

आज तामिळनाडूमध्ये घडले, तेच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकारसोबत कोश्यारींनी केले.

राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या यादीवर कोश्यारींनी अखेरपर्यंत निर्णयच दिला नाही. जे तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी आता केले, तेच उद्धव ठाकरेंनी तेव्हा करायला पाहिजे होते, असेही आता बोलले जात आहे. नाना पटोले यांनी ४ फेब्रुवारी २०२१ रोजी विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर युतीचे सरकार येईपर्यंत विधानसभेला नवा अध्यक्ष मिळू दिला गेला नाही.

अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारींना महाविकास आघाडी सरकारने अनेक स्मरणपत्रे धाडली. कोश्यारींना मात्र या पत्रांचे कधीही स्मरण झाले नाही. ज्या पद्धतीने स्टॅलिन हे केंद्र आणि केंद्र सरकारने पाठवलेल्या राज्यपालांविरोधात लढत आहेत, तसाच लढा उद्धव ठाकरेंनी विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी लढला पाहिजे होता.

एका निर्धारित वेळेत राज्यपालांनी, निर्णय नाही घेतले तर लोकनियुक्त सरकारांचे हात बांधून ठेवण्याचा तो प्रकार होणार आहे. राज्यपाल हे नवे सत्ताकेंद्र बनेल आणि सुदृढ लोकशाहीसाठी हे नक्कीच चांगले नाही, असाच निर्णय न्यायाधीश जे. बी. पारदीवाला आणि न्यायाधीश आर. महादेवन यांच्या खंडपीठाने दिला आहे. केंद्र आणि तामिळनाडू सरकार यांच्यातील सख्य सर्वश्रुत आहे.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तामिळनाडू दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन हे मातृभाषेचे एवढे मोठे पुरस्कर्ते आणि मातृभाषेचा अभिमान बाळगणारे आहेत, पण स्वाक्षरी इंग्रजीत करतात, असे म्हटले होते. यामागे पार्श्वभूमी होती ती 'त्रिभाषासूत्रा'ची. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा विरोध करत 'त्रिभाषासूत्र' लागू करण्यास नकार दिला.

वरवर पाहता हा तामिळनाडूतील सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) आणि भारतीय जनता पक्ष (बीजेपी) यांच्यातील शाब्दिक आणि भाषिक वाद वाटत असला आणि तसे त्याचे चित्रण माध्यमांतून होत असले, तरी ते त्यापुरते मर्यादित नाही. हा दोन संस्कृतींचा संघर्ष आहे. 'भारत हा विविधतेने नटलेला देश आहे', हे बोलून, वाचून, ऐकून कितीही गुळगुळीत झालेले वाक्य असले तरी तेच या देशाचे त्रिकालबाधित सत्य आहे.

त्यालाच मारक असणारी नीती केंद्र सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या माध्यमातून आणली असल्याचा आरोप डीएमके आणि दक्षिणेतील नागरिकांचा, राजकीय पक्षांचा, विचारवंतांचा, सिनेअभिनेते आणि शिक्षणतज्ज्ञांचा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी १४ सप्टेंबर २०१९ रोजी हिंदी दिनानिमित्त देशातील नागरिकांना आवाहन केले होते की, 'मातृभाषेचा वापर वाढवावा आणि त्यासोबतच देशामध्ये सर्वांनी एकमेकांसोबत बोलताना हिंदी भाषेचाच वापर करावा.'

त्यांच्या या वक्तव्याला सर्वाधिक विरोध तामिळनाडू, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यांतून झाला. 'एक देश - एक भाषा' हे भाजपचे धोरण आहे. मात्र दक्षिणेतील राज्यांकडून त्याचा अद्याप स्वीकार झालेला नाही. मात्र केंद्र सरकार वेगवेगळ्या व्यवस्था आणि नियमांच्या आडून त्यांचे धोरण लादण्याचा प्रयत्न करत आहे.

फक्त तामिळनाडूच नाही तर दक्षिणेतील राज्ये हिंदीचा वापर लादून घेण्यास तयार नाहीत. याचा स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनचा मोठा इतिहास आहे. १९३० साली तत्कालीन मद्रास प्रांतातील काँग्रेस सरकारने हिंदी शिकवणे अनिवार्य करायचे आणि टप्प्याटप्प्याने त्याची अंमलबजावणी करण्याचे ठरवले होते.

मात्र मद्रास प्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री सी. राजगोपालाचारी यांनी १९५० मध्ये याबद्दल भूमिका घेतली. मातृभाषेशिवाय दुसरी कोणती भाषा शिकायची असेल तर इंग्रजीचे शिक्षण घेतले पाहिजे. त्याचे कारणही त्यांनी सांगितले, 'इंग्रजी ही आता पूर्णपणे भारतीय भाषा झाली आहे. व्यवहारामध्ये तिचे देशीकरण झाले आहे.'

लालबहादूर शास्त्री यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही (१९६५) हिंदी लादण्याचा प्रयत्न झाला होता. त्यांनी राजकीय व्यवहाराची भाषा इंग्रजीऐवजी हिंदी असेल असे जाहीर केले होते. त्यांच्या या धोरणाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात लोक रस्त्यावर उतरले होते. अखेर लालबहादूर शास्त्रींना त्यांचे आदेश मागे घ्यावे लागले.

त्यासोबतच ६०च्या दशकापासून तामिळनाडूमध्ये काँग्रेसला उतरती कळा लागली. काँग्रेस तामिळनाडूतून नामशेष झाली. १९६७ पासून द्रविडी विचारांच्याच पक्षांची तेव्हापासून आलटून-पालटून सत्ता येऊ लागली. काँग्रेसचं तामिळनाडूच्या राजकारणातील वर्चस्वच संपुष्टात आलं. हेदेखील आजच्या सर्वाधिक बलाढ्य भाजपने ध्यानात घेतलं पाहिजे.

# तवा राईस

**सामग्री :** २ वाटी शिजवलेला भात, २ अख्ख्या लाल मिरच्या, १ चमचा आले-लसूण पेस्ट, फोडणीसाठी तेल, बारीक चिरलेला एक कांदा, गाजर, टोमॅटो (इच्छेप्रमाणे), अर्धा वाटी मटार, १/२ चमचा पाव भाजी मसाला, १/४ चमचा हळद पावडर, १/२ चमचा तिखट, मीठ स्वादानुसार.

**कृती :** सर्वात आधी गाजर आणि मटार उकळून घ्यावे जेणेकरून नरम होतील. एक मोठ्या पॅनमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, अख्ख्या लाल मिरच्या आणि पाव भाजी मसाला टाका. नंतर कांदा, आले-लसूण पेस्ट टाकून मिक्स करा. नंतर टोमॅटो टाकून हलवून घ्या. शिजल्यासारखं वाटल्यावर त्यात मटार आणि गाजर टाका. नंतर हळद, तिखट, गरम मसाला, मीठ टाका. आता भात टाकून हलक्या हाताने हलवून घ्या. वरून कोथिंबीर, लिंबाने सजवून घ्या. दह्यासोबत सर्व्ह करा.



# केमिकल पिलिंग केल्यानंतर कशी घ्याल चेहऱ्याची काळजी ?



चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी, चेहरा उजळावा याकरिता केमिकल पिल्स फायदेशीर ठरतात. केमिकल पिल्समुळे त्वचेवरील निस्तेज आणि मृत स्तर काढायला मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार होते. चेहऱ्यावर लावले जाणारे केमिकल त्वचेतील टिश्यूंचे नुकसान टाळण्यास मदत करतात. केमिकल पिलमध्ये ॲसिड, फळांचा, बोटॅनिकल एक्सट्रॅक्ट किंवा दुधाचा समावेश असतो. त्वचेच्या पोतनुसार आणि समस्येनुसार कोणते पिल वापरावे याचा निर्णय डॉक्टर घेतात. केवळ केमिकल पिल लावून तुम्हाला अपेक्षित निकाल मिळत नाहीत, तर त्यानंतरही त्वचेची काळजी घेणं आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध सेलिब्रिटी डरमॅटोलॉजिस्ट डॉ. जयश्री शरद यांनी दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.



▮ पिल लावल्यानंतर लगेचच आईस कॉम्प्रेसेस चेहऱ्यावर फिरवावे. किमान १०-१५ मिनिटे आईस कॉम्प्रेस चेहऱ्यावर ठेवा.

▮ केमिकल पिलनंतर किमान १० दिवस चेहऱ्याला स्क्रब किंवा गरम पाणी लागणार नाही याची काळजी घ्या. या दिवसांत चेहऱ्याला स्क्रब आणि गरम पाणी वापरू नका.

▮ सौम्य, न्यूट्रल pH फेशिअल क्लिंजरचा वापर करा. चेहरा स्वच्छ करण्यासाठी sebamed olive wash dla वा Cetaphil cleansing lotion चा वापर करावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंट केल्यानंतर लगेचच तसेच सनस्क्रीन न लावता बाहेर पडू नका. उन्हात फिरत असल्यास किमान दोन-दोन तासांनी सतत सनस्क्रीन लावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंटनंतर दोन दिवसांनी चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावायला सुरुवात करा.

▮ केमिकल पिलनंतर काही तासांतच त्वचेवरून एक पातळ स्तर निघायला सुरुवात होते. तो स्तर काढण्यासाठी सतत चेहऱ्याला हात लावू नका किंवा त्वचा खेचू नका.

▮ स्कीन पिलिंग होताना ब्लिचिंग किंवा केस काढण्यासाठी थ्रेडिंग, वॅक्सिंग करणे टाळा.

▮ पिलिंग होताना ॲण्टी ॲक्ने क्रीमचा वापर करू नका. तसेच स्क्रीन लाईटिंग क्रीम वापरणे टाळा.

# वारंवार तोंड येत असल्यास आजमावा हे उपाय

**पचनक्रिया** व्यवस्थित नसेल, किंवा शरीरामध्ये काही कारणाने उष्णता वाढली असेल, तर वारंवार तोंड येऊ लागते. यालाच 'माऊथ अल्सर्स' असेही म्हटले जाते. अनेकदा काही कारणासाठी घेतलेली औषधे उष्ण पडल्यानेही तोंड येऊ शकते. तोंड आले असता काही खाणे-पिणे कठीण होऊन बसते. जिभेवर बारीक फोड येतात आणि क्वचित वेदनाही होतात. बहुतेक वेळी बी कॉम्प्लेक्स घेतल्याने माऊथ अल्सर्स थोड्याच अवधीत बरे होतात. त्याच्या जोडीने काही घरगुती उपायांचा अवलंब करूनही हे माऊथ अल्सर्स बरे करता येऊ शकतात.

तुळस स्वास्थ्यवर्धक असून, यामध्ये वेदनाशमक गुण आहेत. तसेच शरीरातील उष्णता कमी करण्यासही तुळस सहाय्यक आहे. तोंड आले असता दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीची पाने चावून खाल्ल्याने आराम मिळतो. जर पचनक्रिया सुरळीत नसल्याने शरीरातील उष्णता वाढून तोंड आले असले, तर ते बरे करण्यासाठी खसखस उपयुक्त ठरते. थोडी खसखस चावून खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन तोंडातील अल्सर्स लवकर निवळतात.

नारळाचे तेल आणि नारळाचे पाणी हे दोन्ही तोंडातील अल्सर ठीक करण्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. नारळाच्या पाण्याने शरीरातील उष्णता दूर होत असून, नारळाचे तेल तोंडात धरून चूळ भरल्याप्रमाणे खुळखुळविल्यानेही तोंडातील अल्सर ठीक होण्यास मदत होते. याला 'ऑईल पुलिंग' म्हटले जाते. जिथे अल्सर आहेत त्यावरून नारळाचा चव लावल्यानेही तोंडातील अल्सर बरे होतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ मधाच्या पुडीमध्ये थोडासा मध घालून तोंडामध्ये आणि जिभेवर लावल्यास अल्सर ठीक होतात.



# फुफ्फुसाचा कर्करोग टाळण्यासाठी योग उपयुक्त



**फुफ्फुसाचा** कर्करोग हा जगामध्ये सर्वात जास्त आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. केवळ २०१८ या एकाच वर्षामध्ये जगभरामध्ये २,०९३,००० रुग्णांना फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचे निश्चित निदान केले गेले. वास्तविक हा रोग महिलांच्या मानाने पुरुषांमध्ये अधिक आढळून येत असे. पण सध्याच्या काळामध्ये वाढते प्रदूषण, बदललेल्या जीवनशैली यामुळे हा रोग आता महिलांमध्येही आढळून येऊ लागला आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगाचे चार प्रकार असून, यामध्ये 'अडेनोकार्सीनोमा' आणि 'स्क्वामस सेल कार्सीनोमा' हे दोन प्रकार जास्त आढळून येणारे आहेत. सध्याच्या प्रगत काळामध्ये फुफ्फुसाचा कर्करोग योग्य उपचार करून बरा होण्यातला असला, तरी मुळात या कर्करोगाचे निदान वेळेवर होणे अत्यावश्यक असते. या रोगाची अनेक लक्षणे असून, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत खोकला येणे, हात आणि बगलांमध्ये वेदना, मान आणि पाठदुखी, दम लागणे, अचानक वजन जलद घटू लागणे, थुंकीतून रक्त पडणे आणि सतत सुस्ती जाणवणे ही या रोगाची काही प्रमुख लक्षणे आहेत. या रोगावर निश्चित उपचार शोधीत असतानाच, सामन्य 'ॲलोपथीक' उपचार पद्धतीच्या जोडीनेच वैद्यकीय तज्ज्ञ इतर उपचार पद्धतींकडेही पाहत आहेत. या पद्धतींमध्येच योगसाधना फुफ्फुसाच्या कर्करोगावर अतिशय प्रभावी उपाय असल्याचे दिसून आले आहे. या संबंधी रिसर्च अमेरिकेमध्ये सुरू असून, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ येथील २६ रुग्णांवर केमोथेरपी आणि इतर उपचारांच्या सोबतच योगसाधनेद्वारेही यशस्वी उपचार करण्यात येत आहेत. या सर्व रुग्णांवर योगसाधनेचा प्रभाव इतका चांगला झाला, की कर्करोगातून पूर्ण बरे झाल्यानंतरही आता यातील अनेक रुग्णांनी योगसाधनेचा अवलंब त्यांच्या जीवनशैलीमध्ये कायमस्वरूपी केला असल्याचे समजते. योगसाधनेमुळे शरीर तणावरहित होत असून, जे रुग्ण केमोथेरपी किंवा रेडिएशन थेरपीसारखे उपचार घेत होते, त्यांच्यासाठी योगसाधना विशेष फायद्याची ठरली आहे. तसेच या रुग्णांच्या वैयक्तिक शारीरिक क्षमता आणि आवश्यकता लक्षात घेऊन त्यानुसार योगासने त्यांना शिकविली गेल्याने त्याचा या रुग्णांना विशेष लाभ झाल्याचे पहावयास मिळत आहे.

# व्यवस्थित काम करत असलेला स्मार्टफोन तुमच्या 'या' सवयींमुळे होतो खराब

अनेक वेळा स्मार्टफोन योग्य काळजी न घेतल्यामुळे देखील अचानक खराब होतो आणि फोनवर केलेला खर्च व्यर्थ झाल्यासारखा वाटतो. पण, स्मार्टफोन नीट हाताळला आणि वापरताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली तर फोन खराब झाल्यामुळे होणारे नुकसान टाळता येऊ शकते. तुम्हीही या चुका करत असाल तर लगेच या सवयी बदला, अन्यथा तुमचा स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. पाहा या काही सोप्या टिप्स.

**चार्ज करताना लक्ष ठेवा**



स्मार्टफोन चार्ज करताना खूप काळजी घ्यावी लागते. अनेकदा युजर्स फोन चार्जवर ठेवतात आणि त्याबद्दल विसरून जातात. यामुळे स्मार्टफोनचा मदरबोर्डही खराब होऊ शकतो. फोनचा मदरबोर्ड खराब झाल्यास तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागेल. यामुळे फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोन एकदा खराब झाल्यास, त्यानंतर तुम्हाला नवीनच फोन घ्यावा लागेल. कारण फोनच्या मदर बोर्डची किंमत खूप जास्त आहे.

**पाण्यापासून दूर ठेवा**

पावसाळ्यात अनेकदा स्मार्टफोन खराब होतात. कारण, ते मदर बोर्डमध्ये हलका ओलावा आणतात. अशा परिस्थितीत फोनचा मदरबोर्ड कायमचा डेड होऊ शकतो. काही वेळा फोन पाण्याजवळ ठेवल्यास देखील मदर बोर्डमध्ये ओलावा येतो. मदर बोर्डमध्ये ओलावा असल्यास, फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोनचा मदर बोर्ड खराब झाला असेल तर त्यानंतर फोनचा काहीही उपयोग होणार नाही.

**वारंवार चार्जिंग करणेसुद्धा नाही सुरक्षित**

स्मार्टफोनचे वारंवार चार्जिंग करणे देखील टाळावे. जर तुम्ही स्मार्टफोनला वारंवार चार्ज करत असाल तर फोनच्या प्रोसेसरवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामुळे स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. तसेच त्याचा सर्वात मोठा तोटा म्हणजे फोनची बॅटरी कायमची डेड होऊ शकते. अशा परिस्थितीत तुम्हाला फोनची बॅटरी आणि मदर बोर्ड दोन्ही बदलावे लागू शकतात. म्हणजेच चांगली मोठी रक्कम स्मार्टफोन रिपेयरसाठी खर्च करावी लागू शकते.

# चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय

ताजेतवाने दिसण्यासाठी चेहरा स्वच्छ ठेवण्याची गरज असते. पण चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काय, किती आणि कसं वापरायला पाहिजे हे माहिती असणंही गरजेचं आहे. पाहू चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय...



**फेसवॉश :** चेहरा स्वच्छ आणि टवटवीत ठेवण्यासाठी फेसवॉश गरजेचं आहे, पण त्वचेच्या प्रकृतीनुरूप योग्य फेसवॉश वापरला पाहिजे. हर्बल फेसवॉश सर्वात उत्तम. तरीही दिवसातून फक्त दोन वेळा फेसवॉश वापरा. जर आपण मेकअप करत नसाल तर रात्री झोपण्यापूर्वी फक्त पाण्यानेही चेहरा धुवू शकता. ▮ऑईली स्किनसाठी नीम, कोरफड, आणि मिंट फेसवाश योग्य विकल्प आहे. ▮ड्राय स्किनसाठी केसर, मिल्क आणि हनी फेसवॉश वापरू शकता. ▮डेड स्किनसाठी स्क्रब फेसवाश वापरणे योग्य ठरेल.

**कोमट पाणी :** फेसवॉशने चेहरा धुताना पाणी जास्त गरम नसलं पाहिजे याने स्किन खराब होते. त्वचेसाठी जास्त गार पाणीही योग्य नाही म्हणून ताज्या किंवा कोमट पाण्याने चेहरा धुवायला हवा.

**घासू नका :** चेहरा जास्त घासण्याने रंग गोरा दिसले हा विचार चुकीचा आहे. असे करणे हानीकारक ठरू शकतं. कारण अशाने त्वचेवरील नरम परत उतरते आणि स्किन कोरडी पडते. तसेच ज्यांना फेस वाइप्स वापरण्याची सवय असते त्यांनीही दिवसातून दोनपेक्षा जास्त वेळा याचा वापर करू नये.

**मेकअप काढा :** मेकअप काढणे अत्यंत आवश्यक आहे. मेकअप काढल्याने त्वचासुद्धा मोकळा श्वास घेऊ शकते.

# डोळ्यांच्याभोवती काळी वर्तुळे असण्यामागे असू शकतात ही कारणे



अनेकदा शारीरिक विश्रांती जर पुरेशी मिळत नसली, तर डोळ्यांभोवती काळी वर्तुळे दिसून येतात. मात्र केवळ शारीरिक थकवा आल्यानेच डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे येतात असे नाही, तर यासाठी इतरही अनेक कारणे असू शकतात. काहींच्या डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे 'पिग्मेंटेशन' मुळे असू शकतात. हे पिग्मेंटेशन काहींच्या बाबतीत अनुवांशिक असू शकते. दक्षिण आशियाई लोकांमध्ये अशा प्रकारचे पिग्मेंटेशन दिसून येते. पिग्मेंटेशनमुळे जर डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असतील, तर कितीही उपाय-उपचार केले तरी ही वर्तुळे हलकी होतात, पण नाहीशी होत नाहीत.

ज्या व्यक्तींना चेहऱ्यावरील त्वचेवर सोरायसिस किंवा एक्झिमा सारखे त्वचा विकार असतील, त्यांच्याही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येऊ शकतात. या दोन्ही विकारांमध्ये त्वचा लालसर, किंवा गडद रंगाची दिसू लागते. तसेच सतत खाज सुटत असल्याने ही त्वचा आणखीनच काळसर दिसू लागते. त्यामुळे जर डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर एक्झिमा किंवा सोरायसिस असले, तर त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असल्याप्रमाणे भासतात.



ज्या व्यक्तींना सतत डोळे चोळण्याची सवय असते, त्यांच्या डोळ्याच्या आसपासची त्वचा वारंवार चोळली गेल्यामुळे काळसर आणि काहीशी जाडसर दिसू लागते. वारंवार डोळे चोळल्याने डोळ्यांच्या आसपासची त्वचा रगडली जाते. त्यामुळे त्वचेच्या खाली असलेल्या रक्तपेशींना नुकसान पोहोचते आणि त्यामुळे त्वचा काळसर दिसू लागते.

अनेकदा डोळ्यांभोवती काळी वर्तुळे एखाद्या ॲलर्जीमुळेही असू शकतात. या वर्तुळांच्या जोडीनेच डोळ्यांच्या आसपास हलकी सूजही दिसून येते. त्यामुळे याचे निदान डॉक्टरांकडून करून घेऊन योग्य औषधोपचार आणि भरपूर विश्रांतीनंतर ही काळी वर्तुळे नाहीशी होतात.

शरीरामध्ये पाण्याची कमतरता झाल्यास, म्हणजेच डीहायड्रेशन झाल्यासही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येतात. एखाद्या आजारपणामुळे किंवा अतिरिक्त मद्यपानामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स कमी होऊ लागतात, त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे उद्भवतात. अशा वेळी पाण्याचे प्रमाण वाढवल्याने कालांतराने ही समस्या दूर होऊ शकते.

पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही.

# पुदिना सर्दी, अन्नपचनावर उपयुक्त

**पुदिन्याची** पाने अन्नपचन, मुख आरोग्य, सर्दी यावर गुणकारी असल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे. डाबर रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटचे प्रमुख जेएलएन शास्त्री व सर गंगाराम रुग्णालयाचे वरिष्ठ आयुर्वेद सल्लागार परमेश्वर अरोरा यांनी संशोधनाअंती पुदिन्याचे अनेक उपयोग सांगितले आहेत. त्यानुसार पुदिन्यात अँटीऑक्सिडंट व फायटोन्यूट्रिअंट असतात त्यातून पोटातील स्नायूंना आराम मिळतो. पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही. शरीराचे तापमान वाढत नाही. या सगळ्याचा संबंध डोकेदुखी व अर्धशिशी यांच्याशी असतो. मुख आरोग्यात पुदिना गुणकारी असून त्यात जंतुनाशक गुण असतात, परिणामी तोंडातील घातक जिवाणू मारले जातात व जीभ, दात स्वच्छ राहतात. पुदिना कफ व सर्दीवर उपयुक्त आहे. त्वचारोगांवरही पुदिना उपयोगी असून त्यामुळे त्वचेची आग कमी होते व कीटकदंश, इतर ॲलर्जीने होणारे दुष्परिणाम टळतात. पुदिना ही पचनासाठी उपयुक्त वनस्पती असून त्यामुळे गॅस होणे टळते, अपचन, उलट्या व अतिसारापासून संरक्षण मिळते. पुदिन्याची पाने पाण्यात काही तास भिजवून नंतर खावीत व त्याचा अर्क जास्त उपयुक्त असतो.



# सरबत बनवताना लक्ष देण्यासारख्या काही गोष्टी...

- ज्याचे सरबत बनवायचे त्याचा रस किंवा काढा १ वाटी, पाणी १ वाटी, साखर २ वाटी घ्यावी.
- पाणी व साखर एकत्र करून उकळावं.
- उकळी येऊन फेस शांत झाला व मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा.
- त्यात आधी तयार करून ठेवलेला रस / काढा मिसळावा आणि ढवळावा.
- नंतर हे मिश्रण गाळून स्वच्छ, कोरड्या बरणीत भरून ठेवावं. यालाच सरबताचं 'कॉन्सन्ट्रेट' म्हणतात.

**चंदन, वाळा सरबत**

**घटक :** चंदन पूड १० ग्रॅम, वाळा पावडर १० ग्रॅम, पाणी १०० मिली. साखर २०० ग्रॅम.

**कृती :** पाणी उकळल्यावर गॅस बंद करावा. उकळलेल्या पाण्यात चंदन व वाळा पावडर टाकून ते झाकून ठेवावं. दोन तासानं मिश्रण चांगलं ढवळून घ्यावं. नंतर ते गाळून घेऊन मोजावं. १ वाटीच्या मिश्रणास दोन वाटी साखर आणि एक वाटी पाणी घ्यावं. पाणी व साखर एकत्र उकळून घ्यावं. उकळी येऊन फेस शांत झाला आणि मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा. त्यात चंदन वाळ्याचं तयार केलेलं मिश्रण टाकून ते चांगलं ढवळावं. सरबताचं हे सिरप गाळून कोरड्या बरणीत भरून ठेवावं.



**उपयोग**

दाहशामक, डोळ्यांची आग, लघवीची आग कमी करतं. सतत तहान लागणं, ज्वर यासारख्या उन्हाळ्यातील तक्रारीत उपयुक्त.

# आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची शक्यता

**कुटुंबातील** एखाद्या सदस्याला डोळ्याचा कर्करोग असल्यास पुढील पिढीतील लहान मुलालादेखील हा आजार होण्याची दाट शक्यता असते. अनुवंशिक आजार होण्याचे प्रमाण ३० टक्के आहे. मात्र, ७० टक्के मुलांना कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना हा आजार झाल्याचे निदर्शनास आले आहे. आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची दाट शक्यता असते. आईच्या गर्भाशयाच्या कर्करोगाला कारणीभूत 'ह्युमन पॅपिलोमा' हा व्हायरस या मुलाच्या जन्माच्या वेळी त्यांच्या डोळ्यांना बाधा निर्माण करतो. त्यामुळे मुलांना डोळ्याचा कर्करोग होतो. डोळ्यांच्या कर्करोगाचे (रेटिनोब्लास्टोमा) प्रमाण लहान मुलांत सर्वाधिक असून भारतात दरवर्षी या आजाराचे दोन ते अडीच हजार रुग्ण आढळतात. साधारणतः सहा वर्षांच्या आतील मुलांना हा आजार होत असला तरी या आजाराची लागण झालेल्या मुलांवर तत्काळ उपचार केल्यास त्यातून त्यांची मुक्तता करता येते. मात्र ६० टक्के मुलांच्या आजाराचे निदान वेळेत होत नसल्याने त्यांच्यावर उपचार करणे कठीण होते. डोळ्यांच्या ट्यूमरने ग्रस्त रुग्णांच्या संख्येत दोन ते तीन पटीने वाढ झाली आहे. विकसित देशांत रेटिनोब्लास्टोमा होऊनही त्यातून बचावणाऱ्या मुलांचे प्रमाण ९५ टक्के आहे.



**आजाराचा धोका**

डोळ्यांचा कर्करोग लहान मुलांत आढळतो. या आजाराच्या एकूण प्रकरणांपैकी दोनतृतीयांश प्रकरणे वय वर्षे दोनहून कमी वय असलेल्या मुलांत दिसून आली आहेत. तर ९५ टक्के प्रकरणे वय वर्ष पाचहून कमी वय असलेल्या मुलांबाबत आहेत.

**लक्षणे**

- डोळे तिरळे होणे किंवा डोळे सारखे हलणे
- एकाच किंवा दोन्ही डोळ्यांतील दृष्टी मंदावणे
- दोन्ही डोळ्यांत वेगवेगळ्या रंगांची बुब्बुळ असणे
- डोळ्यातल्या बाहुल्या आकाराने मोठ्या भासणे किंवा लाल होणे आणि त्यासह डोळ्यांत तीव्र वेदना होणे

## निदान कसे करावे

डोळ्यांचा कर्करोग झाल्यास नेत्रचिकित्साकडून डोळ्यांची तपासणी आणि इमेजिंग टेस्ट करून घ्याव्यात. त्यातून रेटिनोब्लास्टोमा आहे किंवा नाही, याचे निदान होऊ शकते. याशिवाय बायोमायक्रोस्कोपी, डोळ्यांची अँजिओग्राफी, सी.टी. स्कॅन, एमआरआय, पेटस्कॅन, बायॉप्सी या तपासण्यांच्या सहाय्याने डोळ्याच्या कर्करोगाचे निदान निश्चित होते. डोळ्यांच्या कर्करोगावर रेडिएशन, केमोथेरपी आणि लेझरथेरपी यांच्या सहाय्याने उपचार केले जातात. या उपचारपद्धती आवश्यक असल्या तरी डोळा शस्त्रक्रिया करून काढून टाकावा लागतो. तसेच रेडिएशनमुळे मोतिबिंदू किंवा डोळा पूर्णतः कोरडा होणे, हे दुष्परिणाम दिसून येतात. डोळ्यांचा कर्करोग झालेल्या १० मुलांपैकी ९ मुलांचा रेटिनोब्लास्टोमा पूर्णपणे बरा करता येतो. ट्यूमर डोळ्यांच्या बाहेर पसरला नसेल तर रेटिनोब्लास्टोमा झालेले रुग्ण बरे होऊन भविष्यात निरोगी आयुष्य जगू शकतात.

# महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ! आणखी एक राजकीय घराणं फुटलं... भाऊ आणि भाच्याने ठोकला रामराम



- रायगड जिल्हा हा शेकापचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता
- अनेक वर्षे रायगड जिल्हा परिषदेवर शेकापचा लाल बावटा डौलानं फडकत होता
- राज्यात केवळ सांगोल्यात शेकापचा एकमेव आमदार आहे
- मागील दोन निवडणुकांमध्ये रायगड जिल्ह्यातून शेकापचा एकही आमदार निवडून आला नाही
- माजी आमदार विवेक पाटील भ्रष्टाचार प्रकरणात तुरुंगात आहेत
- महाविकास आघाडीतील वादामुळे जयंत पाटलांना यावेळी विधान परिषदेची पायरी चढता आली नाही.

**मुंबई :** शेकाप नेते जयंत पाटील यांच्याच घरात मोठी फूट पडली आहे. त्यांचे बंधू व अलिबागचे माजी आमदार पंडित पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षानं तिकीट नाकारल्यानं पंडित पाटील नाराज होते. त्यामुळे त्यांनी शेकापला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटलांना मोठा धक्का बसला आहे. जयंत पाटील यांचे बंधू माजी आमदार पंडित पाटील आणि भाचे आस्वाद पाटील हे भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. मुंबईत जाऊन ते भाजपाचं कमळ हाती घेणार आहेत. यामुळे शेकापमधील कुटुंबकलह समोर आला आहे. पंढरपूरमधील पक्षाच्या अधिवेशनात पहिली ठिणगी पडली. त्यानंतर विधानसभा निवडणूकीपासून शेकापच्या पाटील कुटुंबातील वाद चव्हाटयावर आले.

आता कुटुंबातच फूट पडल्यानं शेकापसाठी हा मोठा धक्का मानला जातोय. मात्र, शेकापने यापूर्वी असे अनेक धक्के पचवत पुन्हा उभारी घेतली आहे. त्यामुळे शेकाप कधीही संपणार नाही असा दावा पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केला आहे,

एकेकाळी राज्यात प्रबळ विरोधी पक्ष म्हणून शेकापकडे पाहिलं जात होतं. त्यानंतर पक्षाला हळूहळू उतरती कळा लागली.

एकेकाळी केवळ रायगडच नव्हे तर राज्याच्या राजकारणात दबदबा निर्माण करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाची सध्याची वाटचाल पक्षावर प्रेम करणा-या कार्यकर्त्यांसाठी वेदनादायी आहे. त्यातच आता कुटुंबातच फूट पडल्यानं याचे राजकीय पडसाद उमटणार हे निश्चित आहे.

## मेट्रो कारशेडमध्ये बाधित होणारी झाडे तोडण्याला आक्षेप

**भाईंदर :** मिरा- भाईंदरमध्ये मेट्रो लाईन - ९ आणि इतर मार्गिकांना थांबा देण्यासाठी एमएमआरडीए प्रशासनाने भाईंदर पश्चिमेच्या डोंगरी येथे सरकारी जागेवर मेट्रो कारशेडची जागा निश्चित केली आहे. त्यात बाधित होर्णाया ९९९९ वृक्षांची कत्तल करून काम करण्यासंदर्भात महापालिका आणि एमएमआरडीए प्रशासनाने कोणतीच माहिती न-देता किंवा त्याची नोटीस प्रसिद्ध न-करता नागरिकांना पक्षाची घरटी असल्यास शोधावी व हरकत नोंदवावी अशी फक्त नोटीस काढली होती. त्या नोटीसवरून शहरातील जागरूक नागरिकांनी शेवटच्या अंतिम टप्यात हजारो निवेदने देऊन आपली हरकत नोंदविली होती. त्याचीच एकत्रित जनसुनावणी पालिकेत घेण्यात आली. सर्व उत्तन, पाली, चौक, डोंगरी व मिरा- भाईंदरमधील नागरिकांनी कडाडून



विरोध करत मेट्रो कारशेड नको आणि निसर्गावर कुर्हाड फिरून असणारा विकास आम्हाला नको अशी भूमिका घेण्यात आली. तक्रारींनुसार यात सदरील जी नोटीस प्रसिध्द केली होती,ती अशी साप्ताहिकात प्रसिद्ध करण्यात आली होती,जे छापले जात नाही. त्यात नोटीस अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध केली नव्हती. त्यामुळे नोटीस प्रसिध्द करणार्या सहाय्यक आयुक्त कांचन गायकवाड यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.यावेळी डोंगरी चर्चचे फादर ऑस्कर मेंडोसा यांनी सांगितले की, आम्हाला असा निसगार्चा ह्रास करून होणारा विनाशकारी विकास नको आहे. जगभरात कमी जागेत अंडर ग्राउंड मेट्रो कारशेड बनविले आहेत. त्याप्रमाणे इथे पण खासगी जागेत करावे. तर, जगण्याचे स्वातंत्र्य हिरावले आहे, मागेच उत्तन वासीयांवर अगोदरच कचरा प्रकल्प डागला आहे. त्याठिकाणी ३२ वेळा आगी लागल्याच्या घटना घडल्या आहेत. मुंबई सह मिरा- भाईंदर शहरात प्रदूषण वाढत असताना चौकपासून गोराई पर्यंत असलेला हरित पट्टा नष्ट केला जात आहे.

## महाराष्ट्रातील पंचवटी एक्स्प्रेसमध्ये एटीएमची सुविधा, भारतातील पहिलाच प्रयोग

**ठाणे :** मुंबई ते मनमाडदरम्यान धावणाऱ्या पंचवटी एक्स्प्रेसमध्ये आता एटीएमची सुविधा प्रवाशांना मिळणार आहे. धावत्या ट्रेनमध्ये एटीएम असलेली ही भारतातील पहिलीच एक्सप्रेस ठरली आहे. त्यामुळं आता प्रवाशांना धावत्या ट्रेनमधूनही पैसे काढता येणार आहे. अनेकदा रेल्वेचा प्रवास 15 तासांवरदेखील जातो. अशावेळी प्रवासासाठी काढलेले पैसे खर्च होतात. त्यामुळं प्रवाशांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता असते. हीच गरज लक्षात घेऊन रेल्वेने आता ट्रेनमध्येच एटीएमची सुविधा सुरू केली आहे. त्यामुळं प्रवाशांना आता ट्रेनमधूनही रक्कम काढणे सोयीचे ठरणार आहे.

मध्य रेल्वेच्या मनमाड वर्कशॉपमध्ये आवश्यक तांत्रिक बदल करुन एक खास कोच तयार करण्यात आला आहे. त्यातच हे एटीएम बसवण्यात आले असून हा कोच आता पंचवटी एक्स्प्रेसला जोडण्यात आला आहे. मंगळवारी सकाळी एटीएम सेवा असलेली ही ट्रेन मुंबईत दाखल झाली आहे. पंचवटी एक्स्प्रेसच्या एसी चेअर कारमध्ये हे एटीएम बसवण्यात आले आहे. चालत्या ट्रेनमध्ये एटीएमचे काम योग्य





रितीने पार पाडावे यासाठी योग्य विद्युत प्रणाली आणि संरचनात्मक उपाययोजना करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. बँक ऑफ महाराष्ट्रने हे एटीएम मशीन पुरवले आहे. हे मशीन सुरक्षित राहण्यासाठी याला एक शटरदेखील लावण्यात आले आहे. त्यामुळं रेल्वे प्रवासात ज्यांना पैशांची गरज आहे ते सहज रक्कम काढू शकणार आहेत. मात्र असे असली तरे रेल्वेत फिरणाऱ्या गर्दुल्यापासून एटीएम सुरक्षित ठेवणे तेवढेच आव्हानात्मक असणार आहे.

## १७ कोटी ७४ लाखांचे कोकेन जप्त



**भाईंदर :** भाईंदर पूवेर्ला नवघर पोलीस ठाणे हद्दीत मोतीलाल नगरमध्ये एका महिलेच्या घरातून ११ किलो ८३० ग्राम वजनाचे कोकेन सापडले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात १७ कोटी ७४ लाख ५० हजार रुपयांचे हे अंमली पदार्थ जप्त करत एका महिलेला अटक करण्यात आली आहे. काशीमिरा गुन्हे शाखा युनिट -१ यांना गुप्त माहिती मिळाली. त्यावरून त्यांनी सापळा रचून भाईंदर पूवेर्ला सबिना नजीर शेख (वय ४२ वर्षे) मोतीलाल नगर येथे १५ एप्रिल रोजी सकाळी ११ ते सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान छापा मारला असता महिला आरोपी सबिना शेख ही आपले राहत्या घरात एकूण १७ कोटी ७४ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ११ किलो ८३० ग्रॅम वजनाचा कोकेन हा अंमली पदार्थ आपल्या ताब्यात बाळगला असताना मिळून आली. तिने सदरचा अंमली पदार्थ (ड्रग्स) हा इसम ॲन्डी नावाचा अफ्रिकन नागरिक याच्याकडून आणला असल्याचे सांगितले.

## नाले सफाईच्या कामाला सुरुवात... मे महिन्याच्या अखेरपर्यंत १००% नालेसफाईचा दावा

**विरार :** वसई- विरार शहर पालिकेने पावसाळापूर्व नालेसफाईच्या कामाला ४ एप्रिलपासून सुरुवात केली आहे. आता पर्यंत ५ टक्के नालेसफसफाई झाली असून मे महिन्याच्या अखेरपर्यंत शंभर टक्के साफसफाई होईल, असा दावा पालिकेच्या वतीने करण्यात आला आहे. वसई -विरारमधील अनेक ठिकाणी नाल्यात जलपर्णी, कचरा, गाळ, माती ढिगारे यामुळे नाले तुंबून गेले आहेत. याशिवाय नाले तुंबून गेल्याने पाणी जाण्यास ही



### अतिरिक्त आयुक्तांचा महामार्गावरील नाल्यांचा पाहणी दौरा

वसई झ विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मुंबई- अहमदाबाद महामार्ग क्रमांक ४८ वरील नाल्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून घेण्याबाबत अतिरिक्त आयुक्तांनी राज्य महामार्ग प्राधिकरण व इतर संबंधित विभागांना सूचना दिल्या आहेत. पावसाळ्यात पाणी साचून रहदारीस अडथळा निर्माण होण्याच्या पार्श्वभूमीवर १६ एप्रिल रोजी सकाळी वसोर्वा खाडी (घोडबंदर ब्रिज) येथून ते विरार फाट्यापर्यंत अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी पाहणी दौरा केला. या दौैयात वसईचे प्रांत अधिकारी शेखर घाडगे, एन एच ४८ महामागार्चे प्रकल्प अधिकारी सुहास चिटणीस, महानगरपालिकेचे प्र.शहर अभियंता प्रदीप पाचंगे, कार्यकारी अभियंता प्रकाश साटम व संजय कुलकर्णी, उपायुक्त समीर भुमकर, दीपक झिंझाड, दिपक सावंत, सहाय्यक आयुक्त विश्वनाथ तळेकर, निलेश म्हात्रे, विजय शिंदे, वीज वितरण महामंडळाकडून कार्यकारी अभियंता गिरीश भगत आणि अनंत, तसेच पोलीस प्रशासन व वाहतूक शाखेतील वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

अडचणी येत आहेत. तर दुसरीकडे डासांचा प्रादुर्भाव याशिवाय दुर्गंधीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. शहरात १ लाख ५० हजार ५९० मीटर लांबीचे २०१ नाले असून त्या नाल्याच्या स्वच्छता करण्याची सुरवात एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच केली आहे. नाल्यांची स्वच्छता करण्यासाठी मागील वर्षीपासून ड्रेन मास्टर या आधुनिक यंत्राचा वापर करण्यास सुरुवात केली जात आहे. ड्रेन मास्टर यंत्र हे प्रत्यक्षात नाल्यात उतरून त्याद्वारे स्वच्छता करते. यापूर्वी पोकलेनने स्वच्छता करताना त्यातून निघालेला गाळ हा नाल्याच्या बाजूला काढून ठेवावा लागत होता. परंतु, त्या ड्रेन मास्टर यंत्रामध्येच जमा झालेला गाळ सामावून ठेवून नंतर त्याची विल्हेवाट लावण्यास मोठी मदत होते.

"महानगरपालिकेच्या माध्यमातून नालेसाफसफाईच्या कामाला सुरुवात झाली आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत शंभर टक्के नालेसफाई केली जाणार आहे."

**-नानासाहेब कामठे झ उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग**

## पुण्यात बिहारसारखे भयानक कृत्य... ५ लाखासाठी कोयता काढला

**पुणे :** पुण्यात गुन्हेगारी घटना घडत असून वढ बिहारसारखी दहशत पहायला मिळत आहे. एका तरुणाने हातात लांबलचक कोयता फिरवत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पुण्यातील थरकाप उडवणारा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. ५ लाख रुपयांच्या वादावरुन हा सर्व प्रकार घडल्याचे समजते. या प्रकरणी उत्तम नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा सगळा प्रकार १५ एप्रिल रोजी रात्री साडेबारा वाजता घडला. फिर्यादी हे इस्टेट एजंट असून शहरातील विविध भागात फ्लॅट भाड्याने द्यायचं काम करतात. फिर्यादी यांनी उत्तम नगर परिसरात असणारा एक फ्लॅट त्यांच्या आईच्या नावाने त्यांच्याच नातेवाईक भगवान गायकवाड यांच्याकडून घ्यायचं ठरवलं. यासाठी त्यांनी फ्लॅट धारकाला पाच लाख रुपये दिले होते. काही आर्थिक



अडचणी निर्माण झाल्यामुळे फिर्यादी यांच्या आईने तो फ्लॅट नको असले बाबत डिसेंबर महिन्यात सांगितले. संबंधित फ्लॅटधारकांनी भरलेली रक्कम परत द्यावी यासाठी फिर्यादी आणि त्यांच्या आई यांनी त्यांना वारंवार मागणी केली मात्र संबंधित फ्लॅटधारक पैसे आज देतो उद्या देतो असे उडवा उडवीचे उत्तर देत होते. फिर्यादी हे त्यांच्या कुटुंबीयांसोबत फ्लॅट बुकिंगची भरलेली रक्कम मागण्याकरिता गायकवाड यांच्या घरी पोहोचले. मात्र, त्या ठिकाणी ते भेटले नाहीत. गायकवाड यांच्या मुलाने (ऋषिकेश गायकवाड) फ्लॅटच्या बुकिंग चे पैसे मागितल्याचा राग मनात ठेवत घरातून कोयता आणून थेट फिर्यादी यांच्या अंगावर धावून गेला. फिर्यादी आणि त्यांचे कुटुंबीय यांनी तिथून थेट पोलीस ठाणे गाठलं. पोलिसांकडून याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## भाविकाचा पाय घसरून पडल्याने मृत्यू

**डहाणू :** तालुक्यातील प्रसिद्ध महालक्ष्मी मातेच्या भव्य यात्रोत्सवाला १२ एप्रिल रोजी सुरुवात झाली. यात्रेच्या पहिल्याच दिवशी, महालक्ष्मीच्या सुळका डोंगरावर घडलेल्या दुदैर्वी अपघाताने यात्रेच्या वातावरणावर शोककळा पसरली. सुळका डोंगरावर चढत असताना एका भाविकाचा पाय घसरून पडल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या भाविकाचे नाव मेरीक कन्हैयालाल कांचवाला (वय ३८, रा. सुरत, गुजरात) असे असून ते महालक्ष्मी मातेच्या दर्शनासाठी खास सुरतहून आले होते. खोल दरीत पडल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी पोहोचली आणि



शोधमोहीम राबवून मृतदेह बाहेर काढण्यात आला. १२ एप्रिलच्या मध्यरात्री, महालक्ष्मी यात्रेच्या पारंपरिक ध्वजारोहणाचा विधी पार पडला. रात्री बारा वाजता महालक्ष्मी मंदिरातून पूजाअर्चा करून पुर्जायांच्या हस्ते ध्वज सुळका डोंगराच्या शिखरावर नेण्यात आला. यावेळी स्वयंसेवक, पोलीस दल आणि मोठ्या प्रमाणात भाविकांची उपस्थिती होती. विधीपूर्वक ध्वज बदलल्यानंतर यात्रेचा धार्मिक कार्यक्रम औपचारिकरीत्या सुरू झाला.मात्र, रविवारी पहाटेच्या सुमारास काही उत्साही भाविकांनी सुळका डोंगराच्या टोकावर जाण्याचा प्रयत्न केला. यामध्ये चार ते पाच तरुण सहभागी होते. त्यांनी महालक्ष्मी गडावरील देवीचे दर्शन घेतल्यानंतर आणखी उंचावर चढण्याचा प्रयत्न केला. यावेळी चढताना पाय घसरल्याने या भाविकाचा खोल दरीत पडून जागीच मृत्यू झाला. यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी डहाणू येथील कॉटेज रुग्णालयात नेण्यात आला. वैद्यकीय तपासणीनंतर मृतदेह कांचवाला यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या दुर्घटनेमुळे यात्रोत्सवात सहभागी असलेल्या भाविकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## २ सोनसाखळी चोरांना अटक




**भाईंदर :** मिरारोडमध्ये शुक्रवार ११ एप्रिल रोजी एका महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी चोरणाऱ्या दोन सोनसाखळी चोरांना गुन्हे शाखा १ च्या पथकाने अटक केली आहे. दोन्ही आरोपी मुळ राजस्थानचे आहेत. ते शहरात प्रसिध्द कंपनीत 'फूड डिलिव्हरी बॉय' म्हणून काम करत होते. फिर्यादी माधवी गोरपुनी (५८) या मिरा रोडच्या सालासार अर्पण इमारतीत राहतात. दररोज सकाळी ते फिरण्यासाठी जातात. शुक्रवारी सकाळी नेहमीप्रमाणे ते घराजवळील एल आर तिवारी महाविद्यालयाच्या मागील रस्त्यावरून चालत होत्या. सकाळी साडेसहाच्या सुमारास दोन अज्ञात मोटारसायकस्वारांनी त्यांच्या गळ्यातील २ लाख ५० हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून घेतले. यावेळी झालेल्या झटापटीत माधवी गोपुरनी किरकोळ जखमी झाल्या होत्या. या प्रकरणी मिरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तसेच इतर तांत्रिक दुव्यांच्या आधारे तपास केला आणि सुनिल राज (२२) नीरज राजवट (२५) या दोघांना अटक केली. दोन्ही आरोपी हे मूळचे राजस्थान येथे राहणारे आहे. ते प्रसिध्द कंपनीत फूड डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतात, अशी माहिती गुन्हे शाखा १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांनी दिली. मौज मजा करण्यासाठी त्यांनी ही चोरी केल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्यावर यापूर्वी कुठे गुन्हे दाखल आहेत का त्याचा पोलीस तपास करत आहेत.

# विरार पोलिसांची मोठी कामगिरी

## नागरिकांचे मोबाईल, मौल्यवान दागिने केले परत

**विरार :** वसई- विरार शहरांतील रस्त्यावर चालत असताना नागरिकांच्या हातातून हिसकावून चोरी करून पळून गेलेल्या चोरट्यांकडून विरार पोलिसांनी तब्बल ९ लाख २७ हजार ८०० रुपये किंमतीचे ३६ मोबाईल फोन तसेच मौल्यवान दागिने नागरिकांना शुक्रवार ११ एप्रिल रोजी परत करण्यात यश आले आहे. विरार पोलीस ठाण्यात गहाळ झालेल्या वस्तूंचे तांत्रिक माहितीच्या आधारे विश्लेषण करुन वेगवेगळ्या राज्यांमधून तसेच महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून एकूण ७ लाख ३७ हजार ८०० रुपये किंमतीचे वेगवेगळ्या कंपन्यांचे एकूण ३६ मोबाईल फोन तसेच सीआर नं-५६०/२२ भादवी ३८० मधील एकूण १ लाख ९० हजार रुपये किंमतीचे मौल्यवान दागिने नागरिकांना परत करण्यात गुन्हे प्रकटीकरण पथकास यश



आले आहे. या मौल्यवान वस्तू पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-३ चे जयंत बजबळे यांच्या हस्ते नागरिकांना परत करण्यात आले.

विरार विभागाचे सहायक पोलीस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,एल.एम.तुरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुरेश गायकवाड,पोलीस निरीक्षक (प्रशासन) प्रतापराव कदम, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोउपनिरी अविनाश हाटखिळे, श्रेणीपोउपनिरी शेख, पोहवा सचिन लोखंडे, संदिप जाधव, इंद्रनिल पाटील, अमोल चव्हाण, मोहसीन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड , पोअं दत्तात्रय जाधव, बालाजी शिंदे, प्रफुल सोनार, पोशि उत्कर्ष सोनावणे तसेच पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, विरार यांच्या कार्यालयातील पो. हवा नामदेव ढोणे आणि पो. अं सोहेल शेख यांनी यशस्वीरित्या कामगिरी पार पाडली आहे.

## उल्हासनगरात खडवली बाल आश्रमात मुलामुलींवर अत्याचार

**उल्हासनगर :** ठाणे जिल्ह्यातील खडवली येथील बेकायदा सुरू असलेल्या बाल आश्रमात २९ मुला मुलींवर अत्याचार झाल्याचा संशय व्यक्त केला जात असून



पोलीस तपास सुरू झाला आहे. या प्रकरणी विधान परिषद उपसभापती नीलम गोरे यांनी दखल घेतली आणि आश्रमशाळेला बुधवारी भेट घेतली. यावेळी नीलम गोऱ्हे यांनी राज्यातील सर्वच सरकारी, खासगी आश्रमशाळांची सखोल चौकशी करण्याची सूचना त्यांनी सरकारला केली.

उल्हासनगरात विशेष बालसुधार गृहात या मुलामुलींची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची माहिती घेतली. तसेच या प्रकरणातील दोषी व्यक्तींवर कडक कारवाईचे निर्देश त्यांनी अधिकार्यांना दिले. ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे पसायदान विकास संस्था या नावाने बेकायदा चालवण्यात येत असलेल्या बाल आश्रमात संस्थाचालकांकडून २९ मुलांना बेदम मारहाण केली. तसेच काही मुलांवर लैंगिक अत्याचार झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या अत्याचाराची तक्रार चाईल्ड हेल्प लाईनवर प्राप्त होताच जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने त्या पीडित मुलांची सुटका केली. त्यांना उल्हासनगर येथील मुलींचो विशेषगृह आणि बालगृह तसेच कनिष्ठ आणि वरिष्ठ मुलांचे शासकीय बालगृहात सुरक्षितपणे ठेवण्यात आले. ही माहिती मिळताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी बुधवारी मुलांची बाल सुधारगृहात पीडित मुलांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली.

उपसभापती नीलम गोरे यांनी बुधवारी दुपारी उल्हासनगर महापालिकेच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत या घटने बाबत चिंता व्यक्त करताना सांगितले कि बेकायदा चालणाऱ्या या पसायदान विकास संस्थेकडे सरकारची कोणतीही परवानगी नाही. या संस्थेत दाखल मुलांचा पत्ता नाही, अनेक मुलांचा पत्ता व्हीटी स्टेशन दाखवण्यात आला आहे. त्यांचे बोगस रेशन कार्ड तयार करण्यात आले आहे. ही संस्था बेकायदेशीर चालत आहे. याची संबंधित विभागाला माहिती नाही यावर त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. उपसभपती नीलम गोरे यांनी या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली.

ह्यपसायदान विकास संस्थाह्व चा संचालक बबन नारायण शिंदे, त्यांची पत्नी आशा बबन शिंदे, संचालक मुलगा प्रसन्न बबन शिंदे, त्यांना मदत करणारे प्रकाश सुरेश गुप्ता आणि दर्शना लक्ष्मण पंडित या पाच जणांविरुद्ध पोक्सो तसेच इतर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे आरोपी खडवली येथील राहणारे आहेत.

अनाधिकृतपणे चालविण्यात येणाऱ्या बालआश्रमात एकूण २९ बालकांची सुटका केली. यामध्ये २० मुली आणि ९ मुलांचा समावेश आहे. सुटका केलेल्या सर्व बालकांना बाल कल्याण समितीसमोर सादर करण्यात आले. समितीने मंगळवारी रात्री उशिरापर्यंत या बालकांच्या देखरेखेबाबत आदेश देण्याची प्रक्रिया पूर्ण केली. सुटका करण्यात आलेल्या बालकांपैकी काही खडवली येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत होते. त्यांची आगामी परीक्षा लक्षात घेता, शिक्षण विभागाने त्यांच्या परीक्षेसाठी विशेष व्यवस्था करावी, यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधण्यात येत आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाने या प्रकरणी तत्परतेने कार्यवाही केली असून बालकल्याण समितीच्या आदेशानुसार सर्व बालकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com